मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | शनिवार, ०२ नोव्हेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १३३ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## यूनुस सरकारकडून हिंदू धर्मगुरुंवर देशद्रोहाचा गुन्हा

**ढाका :** बांगलादेशमधील मोहम्मद यूनुस सरकारला हिंदुंवरील हल्ले थांबवण्यात यश आलेलं नाही. अशात ज्या लोकांनी हिंदुंवरील अत्याचारावर आवाज उठवला आहे अशा नेत्यांवर आणि धर्मगुरुंवर देशद्रोहाचे आरोप दाखल करण्यात आले आहेत. बांगलादेशमधील हिंदू धर्माचे प्रमुख नेते चिन्मय कृष्ण दास ब्रम्हचारी यांच्यासह अन्य लोकांच्याविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्वांवर 25 ऑक्टोबर रोजी चटगांव येथील न्यू मार्केटच्या चौकात बांगलादेशच्या राष्ट्रध्वजाच्या वर भगवा झेंडा फडकवण्याचा आरोप आहे. चिन्मय कृष्णसह सर्व लोकांवर ३० ऑक्टोबर रोजी विविध कलमाअंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.



मोदी आमचे चांगले मित्र, हिंदूंचं संरक्षण करु!

पान 8

### उद्या अंक नाही

*दिवाळी पाडव्यानिमित्त आज दै. वृत्तमानस कार्यालयास सुट्टी असल्यामळे उद्याचा अंक प्रकाशित होणार नाही याची सर्व वाचक, जाहिरातदार व वितरकांनी नोंद घ्यावी.*

***दिवाळी पाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.***

# अरविंद सावंतांना 'माल' प्रकरण भोवलं
## शायना एन सी यांच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल

प्रतिनिधी
मुंबई

शिंदे सेनेच्या मुंबादेवीतील उमेदवार शायना एन सी यांच्याविरोधात अपमानास्पद वक्तव्य केल्याप्रकरणी ठाकरे सेनेचे खासदार अरविंद सावंत यांच्याविरोधात आज गुन्हा दाखल करण्यात आला. मुंबईतील नागपाडा पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला. शायना एन सी यांनी स्वत: नागपाडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

शिवसेना ठाकरे सेनेचे नेते आणि खासदार अरविंद सावंत यांनी शायना एन सी यांच्याबद्दल बोलताना "इम्पोर्टेड माल" अशी टिप्पणी केली होती. याविरोधात तक्रार नोंदवण्यासाठी शिंदे सेनेच्या उमेदवार शायना एन सी यांनी नागपाडा पोलिस ठाणे गाठले होते. महिला शिवसैनिकांनी नागपाडा पोलिस ठाण्याबाहेर घोषणाबाजी करत शायना एन सी यांच्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य केल्याबद्दल खासदार अरविंद सावंत यांनी माफी मागावी, अशी मागणी केली होती.



सावंत यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्यात आल्यानंतर महाविकास आघाडीचा उल्लेख महाविनाश आघाडी असा करत शायना एनसी यांनी जोरदार हल्लाबोल केला. मुंबादेवीतील महिला त्यांना त्यांची जागा दाखवतील असेही शायना म्हणाल्या. एफआयआरची कॉपी दाखवत शायना म्हणाल्या की, ही एफआयआरची कॉपी आहे. ही महाविनाश आघाडी महिलांचा सन्मान करत नाही. देशभरात आज लक्ष्मीपूजन आहे. शुभ मुहूर्त आहे. पण अरविंद सावंत मला 'माल' म्हणतात. माल म्हणजे आयटम. मला सार्वजनिक जीवनात आतापर्यंत 20 वर्षे झाले.

पान 5 वर

### बाळासाहेब असते तर त्यांनी थोबाडं फोडलं असतं



*मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या प्रकरणावर बोलताना म्हणाले की, बाळासाहेब असते तर त्यांनी अशा नेत्यांचं थोबाडं फोडलं असतं. लाडक्या बहिणींबद्दल अपमानास्पद विधान करणाऱ्यांना जनता कधीच माफ करणार नसल्याचेही शिंदे म्हणाले. शायना एनसी यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याच्या त्यांनी यावेळी निषेध केला.*

## विरोधकांना अडचणीत आणण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून
# सत्तेचा वापर



प्रतिनिधी
बारामती

दिपावली पाडव्याच्या एक दिवस अगोदरच शुक्रवारी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे गोविंदबाग हे निवासस्थान गर्दीने फुलून गेल्याचे दिसून आले. शरद पवार बारामती दौऱ्यावर आहेत. त्यांनी शुक्रवारीही पक्षफूटीवर भाष्य करत सत्तेत जाणाऱ्यांना चिमटे काढले. जो विरोधात आहे, त्याला अडचणीत आणणे अशी सत्ताधारी नेत्यांची भूमिका असून ती दुर्दैवी आहे, असे ते म्हणाले.

शरद पवार यावेळी बोलताना म्हणाले, राज्यातील जनतेने गतवेळी आपल्याला 54 जागा दिल्या. पण सत्तेचा गैरवापर करत हे सरकार स्थापन झाले. एक काळ असा होता की, विकासात महाराष्ट्र क्रमांक एकवर होते. आज ते सहाव्या स्थानी गेले. ज्यांच्या हाती सत्ता दिली त्यांना सत्तेची जाण नाही. जिल्ह्यातील सामान्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी आपण त्यांना पदे दिली. कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून ते मंत्री झाले, पण त्याची आठवण आपल्या सहकाऱ्यांना राहिलेलं नाही, या शब्दांत पवार यांनी टोले लगावले.

साखर कारखानदारी आपण उभी केली, शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले, त्यामुळे महाराष्ट्र साखर धंद्यातील महत्त्वाचे राज्य झाले. राज्यात सत्तांतर होणार आहे. सत्ता आल्यानंतर शिरूरचा घोडगंगा साखर कारखाना कसा सुरू होत नाही, ते मी बघतो, असेही शरद पवार म्हणाले. शिवाय जो विरोधात आहे, त्याला अडचणीत आणणे अशी सध्याच्या नेत्यांची भूमिका असल्याची टीका त्यांनी अजित पवार यांचे नाव न घेता केली. तुतारी चिन्हाऐवजी ट्रम्पेट असाच उल्लेख होणार असल्याने याचा आपल्याला कोणत्याही प्रकारचा फटका बसणार नाही, असेही शरद पवार म्हणाले.

### म ह त्वा चे

#### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षेत वाढ

**नागपूर :** भाजपचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या धरमपेठ येथील निवासस्थानी मात्र सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे. या संदर्भात स्वतः फडणवीस यांना विचारले असता त्यांनी याबाबत तुम्ही पोलिसांनाच विचारा, असे उत्तर दिले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक पार्श्वभूमीवर ही सुरक्षा वाढ करण्यात आली आहे. एसआयडीकडे मिळालेल्या इनपुटनुसार ही सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. स्वतः फडणवीस नागपुरातील दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या काळात त्यांच्या निवासस्थानी राज्यभरातून भेटणाऱ्यांची गर्दी लक्षात घेता ही सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे. आधीच झेड सिक्युरिटी असलेल्या गृहमंत्री फडणवीस यांच्या सुरक्षेत आता अधिक खबरदारी घेतली जात असून त्यांच्या सुरक्षेसाठी 'फोर्स वन' तैनात करण्यात आले आहे.

#### फटाके फोडण्याच्या वादातून हत्या

**मुंबई :** मुंबईत फटाके फोडण्यावरून वाद झाला आणि वाद वाढल्यानंतर एका 20 वर्षीय तरुणाची चाकूने वार करून हत्या करण्यात आली. विवेक गुप्ता असे हत्या करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी अँटॉप हिल परिसरातील जय महाराष्ट्र नगरमध्ये ही घटना घडली. मयत तरुण विवेक गुप्ता याच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. आरोपींमध्ये एका महिलेचाही समावेश आहे. इतर आरोपींचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. शंकर गल्लीत फटाके फोडत असताना तिथून आरोपी कार्तिक आर. मोहन देवेंद्र याने दुसरीकडे फटाके फोडण्यास सांगितले. त्यावरून फटाके फोडणाऱ्यांचा कार्तिकसोबत वाद झाला आणि हत्या घडली.

सविस्तर वृत्त पान 3 वर

#### महायुतीच्या नेत्यांच्या संपत्तीत प्रचंड वाढ... चतुर्वेदींनी मांडला लेखाजोखा


**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी अनेक बड्या नेत्यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. या अर्जासोबतच त्यांनी आपल्या संपत्तीची देखील माहिती जोडली आहे. पण महायुतीच्या काही नेत्यांच्या संपत्तीत झालेली भरघोस वाढ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या प्रियांका चतुर्वेदी यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. त्यांनी महायुतीतील एकूण सात नेत्यांची नावे पोस्ट केली असून त्यांच्या संपत्तीत नेमकी किती वाढ झाली आहे, याबाबतची देखील माहिती दिली आहे. चतुर्वेदी यांनी महायुतीच्या गीता जैन, पराग शाह, राहुल नार्वेकर, प्रताप सरनाईक, तानाजी सावंत, दीपक केसरकर आणि धनंजय मुंडे यांच्या संपत्तीची माहिती सोशल मीडियावर पोस्ट केली आहे.

सविस्तर वृत्त पान 3 वर

## महायुतीच्या प्रचारातून अजित पवार गायब
### जाहिरातींमध्ये शिंदे, फडणवीस आणि मोदींचे फोटो

प्रतिनिधी
मुंबई

राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुती उतरली आहे. पण महायुतीच्या प्रचारांत अजित पवार गायब आहेत. महायुतीच्या प्रचाराच्या जाहिरातींमधून अजित पवार यांचे फोटो गायब आहेत. फक्त पुण्यातच नाही तर संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात हे चित्र आहे. फ्री प्रेस जर्नल या इंग्रजी दैनिकाने याबाबत वृत्त दिले आहे. महायुतीच्या पोस्टरमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे चेहरे आहेत. महायुतीच्या प्रचाराच्या अनेक जाहिराती मराठी वाहिन्यांवर चालवल्या जात आहेत. या जाहिरातींमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अजित पवार यांचा फोटोच लावलेला नाही



गेल्या काही दिवसांत भाजप आणि अजित पवार यांच्यात दुरावा निर्माण झाला आहे का असा सवाल उपस्थित होतोय. कारण ठरले आहे नवाब मलिक यांची उमेदवारी. अजित पवार यांनी नवाब मलिक यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. पण देवेंद्र फडणवीस यांनी मलिक यांचा प्रचार करणार नाही असे स्पष्ट केले आहे.

## इंस्टावर पोस्ट शेअर करत संपवले जीवन
### व्हिडिओत शिवसेना नेत्याच्या भावाचं नाव

प्रतिनिधी
मुंबई

मालाडमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. ऐन दिवाळीच्या दोन दिवस अगोदरच एका व्यक्तीने इंस्टाग्रामवर रिल्स टाकून आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. चंद्रेश तिवारी असं या जीवन संपवलेल्या व्यक्तीचं नाव आहे. विशेष म्हणजे चंद्रशे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी इंस्टावर व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्याध्ये, आत्महत्येस शिवसेना नेते रामदास कदम यांच्या बंधुचं नाव घेतलं. दरम्यान, याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

चंद्रेश तिवारी यांनी व्हिडिओतून कदम यांचं नाव घेत पोस्ट केली. पोस्टमध्ये आत्महत्येस रामदास कदम यांचे बंधू सदानंद कदम यांच्यासह आणखी दोघांची नावे घेत त्यांना जबाबदार ठरविण्यात आलं आहे. सदानंद कदम यांनी मुंबईत इतर कोणत्याही कंपनीत काम करू देणार नाही, असा इशारा चंद्रेशला दिला होता. याप्रकरणी, चंद्रेशचा भाऊ पवन तिवारी यांनी कुरार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

सदानंद कदम यांच्यासह धमकी देणाऱ्या आणखी दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, यातील आरोपी शिवसेनेचे नेते रामदास कदम यांचे बंधू सदानंद कदम देखील आहेत. पोलिसांकडून खेडमध्ये शोध मोहीम सुरू आहे.

## आम्हा सर्वांचे फोन आजही टॅप होतायत...
### *राऊतांचा शुक्लांवर गंभीर आरोप*

प्रतिनिधी
मुंबई

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यावर खासदार संजय राऊत यांनी अनेक गंभीर आरोप केले आहेत. इतकेच नाही तर त्यांच्या माध्यमातून आमचे फोन आजही टॅप केले जात असल्याचा मोठा दावा राऊत यांनी केला आहे.

शुक्ला यांना महासंचालक पदावरुन हटवण्याची मागणी आम्ही निवडणूक आचारसंहिता लागण्याच्या आधीपासून केली आहे. मात्र, तरी देखील निर्णय घेतला जात नाही. रश्मी शुक्ला या आमच्या कार्यकर्त्यांवर आणि पदाधिकाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करून दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप देखील संजय राऊत यांनी केला.

आचारसंहिता लागण्याच्या आदल्या रात्रीपर्यंत भाजप, एकनाथ



शिंदे आणि अजित पवार यांनी आपापल्या उमेदवारांकडे पंधरा ते वीस कोटी रुपये पोहचवले आहेत आणि विशेष म्हणजे हे सर्व पोलिस बंदोबस्तात झाले आहे. राज्यात हेलिकॉप्टरने पैसे जातात. त्यांना कोण अडवणार? असा प्रश्न राऊत त्यांनी उपस्थित केला. जे काही दोन पाच कोटी रुपये पकडले जात आहेत, ते किरकोळ असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. राज्यात आता पोलिसांची वाहनेदेखील तपासली जाणार असल्याचे वृत्त समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर राऊत यांनी हा आरोप केला आहे.

ज्या पक्षाकडून शिवसेनेची मते कापले जातील, त्यांना मदत करायची हे महाराष्ट्र

पान 5 वर

### *शेअर बाजारात मुहूर्त ट्रेडिंगची जोरदार सुरुवात*
## सेन्सेक्स 634 अंकांनी वाढला, तर निफ्टीही 24,300च्या वर

प्रतिनिधी
मुंबई

दिवाळीनिमित्त शेअर मार्केटमध्ये मुहूर्त ट्रेडिंगची परंपरा 5 दशकांहून अधिक जुनी आहे. व्यापारी या दिवशी देवी लक्ष्मीची विशेष पूजा करतात आणि या दिवशी आपले काम थांबवत नाहीत, तर आपले काम अधिक भक्तीने करतात. काही लोक या दिवशी नवीन व्यवसाय सुरू करतात.दिवाळीत हिंदू लेखा वर्ष संवतची सुरुवात होते आणि व्यापारी या दिवशी त्यांच्या लेजरची पूजा करतात. असे मानले जाते की दिवाळीच्या शुभ दिवशी व्यवसाय सुरू केल्यास वर्षभर समृद्धी येते.


मुहूर्त ट्रेडिंगच्या प्रीओपनिंग सेशनमध्ये BSE 1,100 पेक्षा जास्त अंकांनी आणि निफ्टी सुमारे 200 अंकांनी वाढला होता. शेअर बाजारात मुहूर्त ट्रेडिंग 2024 सुरू झाले आहे. सुरुवातीच्या व्यवहारात, 30 शेअर्सचा सेन्सेक्स 634 अंकांच्या वाढीसह



व्यवहार करताना दिसत आहे, तर निफ्टीने 100 अंकांच्या वाढीसह 24300 चा टप्पा पार केला आहे. आज महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, आयशर मोटर्सच्या शेअर्समध्ये वाढ झाली आहे. ऑक्टोबर महिन्यातील वाहन विक्रीचे आकडे जाहीर झाल्यानंतर वाहन शेअर्समध्ये वाढ झाली आहे.

शेअर बाजाराचे मार्केट कॅप गेल्या ट्रेडिंग सत्रात 444.73 लाख कोटी रुपये होते. त्याच वेळी, संवत 2080 ते संवत 2081 दरम्यान, भारतीय शेअर बाजारातील गुंतवणूकदारांच्या संपत्तीत 128 लाख कोटी रुपयांची

पान 5 वर




## एकनाथ शिंदेंनी परवानगी दिली तर मनसेबरोबर काही जागांवर युती
### फडणवीसांच्या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना उधाण

प्रतिनिधी
मुंबई

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा युतीमध्ये समावेश होण्याबाबत मोठे विधान केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परवानगी दिली तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेबरोबर काही जागांवर युती होऊ शकते, असे मत फडणवीस यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे आता माहीम विधानसभा मतदारसंघावर सर्वांचेच लक्ष लागले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मनसेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा दिला होता. मात्र विधानसभा निवडणुकीत



स्वतंत्र लढण्याचा निर्णय राज ठाकरे यांनी घेतला आहे. इतकेच नाही तर राज ठाकरे यांनी अनेक मतदारसंघ उमेदवार देखील घोषित केले आहेत. मात्र विधानसभेमध्ये मनसे आणि युतीमध्ये समावेश होण्याची शक्यता अजूनही वर्तवली जात आहे. त्यात आता देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यामुळे या घटना घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज ठाकरे हे आमचे चांगले मित्र असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीत आम्ही समोरासमोर लढत आहोत. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संमती दिली तर एक दोन ठिकाणी त्यांना मदत करणे सोपे होईल, त्यामुळे ते युतीचा एक भाग

पान 5 वर



*मुंबई: अनुबोध व नवचैतन्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाच्या दिवाळी पहाटेस 'शब्दसंचित' कार्यक्रमाचे काल पहाटे बोरीवलीत आयोजन करण्यात आले होते. या वर्षी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, त्याचेच औचित्य साधत संत -साहित्य ते सिने - नाटकातील प्रतिभावान कवी गितकारांच्या समर्थ लेखणीचा परिसस्पर्श झालेल्या एका पेक्षा एक सरस गीतांची स्वरबरसात अनुभवयाला भेटला.पहाटे ६:३० वा. बोरीवलीच्या प्रबोधनकार ठाकरे नाट्यमंदिरात सदरहू मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते . प्रसिद्ध गायिका माधुरी करमरकर , श्रीरंग भावे ,सायली महाडिक व अभिषेक तेलंग आपल्या सुरेल आवाजात सुमधुर गीते श्रोत्यांपुढे सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे संगीत संयोजन सुप्रसिद्ध संगीतकार /संगीत संयोजक कमलेश भडकमकर यांचे होते, आपल्या रसाळ निवेदनातून विविध कवी - गीतकारांचा गानप्रवास,आठवणी व किस्से सादर केले ते प्रसिद्ध अभिनेते, निवेदक विघ्नेश जोशी यांनी.*



## थोडक्यात

### बोलण्यात गुंतवून वृद्ध महिलेची सोनसाखळी पळवली

**मुंबई:** चांगली नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून वृद्ध महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांची सोनसाखळी दोघांनी लंपास केल्याची घटना मुलुंड परिसरात घडली. याप्रकरणी वृद्ध महिलेने केलेल्या तक्रारीवरून मुलुंड पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. विद्या चव्हाण (६१) असे या वृद्ध महिलेचे नाव असून त्या कळवा परिसरात राहतात. गेल्या अनेक वर्षांपासून त्या एका कार्यालयात सफसफाईचे काम करीत आहेत. कार्यालयातील काम संपल्यानंतर २६ ऑक्टोबर रोजी त्या घरी जात होत्या. यावेळी त्यांना रस्त्यात एका व्यक्तीने हाक मारली आणि चांगली नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले.चांगल्या पगाराची नोकरी मिळेल या अपेक्षेने महिलेने तत्काळ त्याला होकार दर्शवला. नवे कार्यालय दाखवण्याच्या बहाण्याने आरोपीने महिलेला एका इमारतीच्या मागे नेले. तेथे त्याचा एक साथीदार उभा होता. महिलेला गळ्यातील मोठी सोनसाखळी पर्समध्ये ठेवण्यास त्यांनी सांगितले. महिलेने तत्काळ आरोपींवर विश्वास ठेवून सोनसाखळी पर्समध्ये ठेवली. याचवेळी आरोपींनी महिलेला बोलण्यात गुंतवून तिच्या पर्समधील सोनसाखळी घेऊन पोबारा केला.

### स्मशानभूमीत पर्यावरणाचा समतोल राखण्यावर भर

**मुंबई:** मुंबईतील स्मशानभूमींमध्ये आता पर्यावरणाचा समतोल राखण्यावर महापालिकेने भर दिला आहे. स्मशानभूमीत जास्त लाकडांचा वापर केल्याने होणारे प्रदूषण रोखण्यासाठी आता कमीतकमी लाकडांचा वापर करून चिता रचल्या जाणार आहेत. मुंबईतील नऊ स्मशानभूमींमध्ये याचा वापर केला जाणार आहे. या नव्या पद्धतीच्या चितांमध्ये पॅलेट आणि ब्रिकेटचा इंधन म्हणून वापर केला जाणार आहे. त्यामुळे अंत्यसंस्काराचा कालावधी कमी होईल व वायू प्रदूषणही कमी होणार आहे.पालिकेच्या विविध स्मशानभूमींमध्ये मृतदेहांवर पारंपरिकपणे अंत्यसंस्कार करण्यासाठी लाकडी चिता पद्धती, विद्युत दाहिनी व गॅस दाहिनी पद्धतीचा वापर केला जातो. पारंपरिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात लाकडाचा वापर केला जातो. त्यामुळे पर्यावरणाची हानी होते. त्यामुळे मुंबईतील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारावेळी कमी प्रदूषण, शिवाय इंधनाची बचत होईल. यादृष्टीने खबरदारी घेतली जाणार आहे. मुंबईतील नऊ स्मशानभूमींत ही सुरुवात केली जाणार आहे. पालिकेने २०२० सालापासून या पद्धतीचा वापर प्रायोगिक तत्त्वावर महापालिकेच्या शीव स्मशानभूमीमध्ये केला होता. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आता मुंबईतील नऊ स्मशानभूमींमध्ये वापर केला जाणार आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## बोईसरमध्ये महायुतीतील बंडखोरीचे वारे

# बहुजन विकास आघाडी-महाविकास आघाडीला लाभाचा अंदाज

**प्रतिनिधी**
**■ वसई**

बोईसर विधानसभा मतदारसंघात भाजपच्या अंतर्गत मतभेदांमुळे निवडणुकीत नव्या समीकरणांची शक्यता निर्माण झाली आहे. भाजपमधील निष्ठावंत कार्यकर्ता जगदीश धोडी यांना उमेदवारी नाकारल्याने त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत बंड पुकारले आहे. भाजपने माजी आमदार आणि शिंदे सेनेत नुकतेच सामील झालेले विलास तरे यांना उमेदवारी दिल्याने, महायुतीला या निवडणुकीत मोठा आघात बसण्याची शक्यता आहे.

भाजपमधील या बंडखोरीमुळे मत विभाजन होऊन बहुजन विकास आघाडी (बविआ) आणि महाविकास आघाडी (मविआ) यांना फायदा होण्याची चिन्हे आहेत. या मतदारसंघात महाविकास आघाडीचे ठाकरे गटाचे डॉ. विश्वास वळवी, महायुतीकडून विलास तरे, आणि अपक्ष उमेदवार म्हणून जगदीश धोडी हे तिघेही प्रमुख दावेदार आहेत. लोकसभेतील मागील निकालांवर विचार करता, बविआ-मविआला भाजपच्या बंडामुळे येथे अधिक पाठिंबा मिळू शकतो, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

भाजपमधील बंडखोरीचे इतिहास पाहता, 2019 सालच्या विधानसभा निवडणुकीतही विलास तरे यांचा याच बंडामुळे पराभव झाला होता. यावेळीही धोडी चांगली मते घेतल्यास, मतविभाजनामुळे मविआ किंवा बविआच्या उमेदवाराला निर्णायक लाभ होण्याची शक्यता आहे. बंडखोरीच्या वाऱ्यामुळे बोईसरच्या निवडणुकीत रंगत आली असून, महायुतीसाठी ही निवडणूक आव्हानात्मक ठरू शकते.

# वसईत मध्यरात्रीचा 'फटाकेबाजीचा तांडव'

## नियमांची पायमल्ली; प्रशासनाचे दुर्लक्ष

## वायू प्रदूषणात वाढ; हवेची गुणवत्ता खालावली

**प्रतिनिधी**
**■ वसई**

फटाके फोडण्यासाठी सायंकाळी 7 ते रात्री 10 वाजेपर्यंतची मुभा असतानाही वसईत मध्यरात्रीनंतरही फटाक्यांचे आवाज थांबायचे नाव घेत नाहीत. नागरिक रात्री दीड ते दोन वाजेपर्यंत कर्णकर्कश आवाजात फटाके फोडत असल्यामुळे ध्वनी आणि वायू प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे, आणि यामुळे नागरिकांची झोपही उडत आहे. फटाक्यांच्या या गोंगाटामुळे वसईतील हवा प्रदूषणाच्या पातळीवर पोहोचली असून श्वसन आणि अन्य आरोग्य समस्यांमध्ये वाढ होत आहे.

दरवर्षी प्रमाणे, प्रशासनाने यंदाही फटाक्यांसाठी वेळेची मर्यादा जाहीर केली होती. मात्र नियमांचे उल्लंघन करून अनेकजण मध्यरात्रीपर्यंत फटाके फोडत असल्याचे दिसून येत आहे. सुतळी बॉम्बसारख्या कर्णकर्कश आवाजाच्या फटाक्यांमुळे नागरिकांना डोकेदुखी, कानठळ्या फुटणे यासारखे त्रास होत आहेत. याशिवाय, वसईतील आधीच ढासळलेली हवेची गुणवत्ता अधिकच खालावत आहे.

हवेतील प्रदूषण कमी ठेवण्यासाठी फटाके फोडण्यावर वेळेची बंधने घालण्यात आली आहेत.परंतु नियमांचे उल्लंघन झाल्यास प्रशासनाने कारवाई करणे गरजेचे आहे. मात्र, या प्रकरणात प्रशासन सुस्त आहे. त्यामुळे वसईतील नागरिकांना या कर्णकर्कश फटाक्यांमुळे होणाऱ्या त्रासाचा सामना करावा लागत आहे.

# हितेंद्र ठाकूरांची 'शिट्टी' गायब!

## बविआला आता नवे चिन्ह शोधावे लागणार

**प्रतिनिधी**
**■ पालघर**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी शिट्टी हे निवडणूक चिन्ह जनता दल (युनायटेड) या पक्षासाठी आरक्षित ठेवण्याच्या सूचना भारत निवडणूक आयोगाने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांना दिल्या आहेत. या निवडणुकीत बहुजन विकास आघाडी सह इतर नोंदणीकृत राजकीय पक्ष तसेच अपक्षांना शिटी या चिन्हाचा वापर करता येणार नसल्यामुळे निवडणुकीसाठी इतर चिन्हाचा आधार घ्यावा लागणार आहे.

निवडणूक आयोगाने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांना ३० जानेवारी २०२४ रोजी पत्र पाठवून आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी शिटी हे चिन्ह जनता दल (युनायटेड) या पक्षासाठी राखीव असल्याचे स्पष्ट केले होते. त्या अनुषंगाने २ फेब्रुवारी २०२४ रोजी या आशयाच्या सूचना जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. मात्र लोकसभा निवडणुकीत जनता दल (युनायटेड) या पक्षाने उमेदवारी दाखल न केल्याने या चिन्हाचा वापर बहुजन विकास आघाडीने पालघर लोकसभा जागेसाठी केला होता.

भारत निवडणूक आयोगाने २३ मार्च २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेमध्ये शिटी या चिन्हाचा समावेश मुक्त चिन्हांच्या यादीमध्ये केल्याने निवडणूक चिन्हे (राखीव व वाटप) कायदा १९६८ मधील तरतुदीच्या आधारे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी अनेक उमेदवारांनी या चिन्हाची मागणी केली होती. या अनुषंगाने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे ३१ ऑक्टोबर रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे या संदर्भात मार्गदर्शन करण्याची विनंती केली होती.

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाने काल सायंकाळी तातडीने उत्तर देताना आगामी विधानसभा निवडणुकीसाठी शिटी हे चिन्ह जनता दल (युनायटेड) या पक्षासाठी राखीव ठेवण्याचे स्पष्ट केले आहे. तसेच हे चिन्ह इतर राजकीय पक्ष अथवा अपक्षांना देण्यात येऊ नये असे देखील सुचित केल्याने वसई, नालासोपारा व बोईसर येथे आमदार असणाऱ्या बहुजन विकास आघाडीला नवीन चिन्हाचा शोध घेणे आवश्यक ठरणार आहे.



*मुंबई: मुंबईतील भांडुप येथील दर्गा रोडवरील खिंडी पाड्यातील'आर. के. श्री सिद्धिविनायक मंदिर सेवा समितीच्या वतीने विश्वस्त रमेश खानविलकर यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराज संस्थान-देहू येथे दिवाळीनिमित्त ज्येष्ठ संतांना वस्त्रदान व बाल वारकऱ्यांना मिठाई वाटप केले.*

# 'एकजूट' दिवाळी अंकाचे उत्साहात स्वागत

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

सहकारी बँक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांमध्ये वाचनीय व लोकप्रिय ठरत असलेल्या 'सहकार एकजूट' या त्रैमासिकाच्या दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा को-ऑपरेटीव्ह बँक एम्पलॉईज युनियन, मुंबईचे अध्यक्ष व माजी केंद्रीय राज्य अर्थमंत्री आनंदराव अडसूळ यांच्या हस्ते दादर-पश्चिम येथे संपन्न झाला. यावेळी अनेक मान्यवरांनी तसेच वाचकांनी एकजूट दिवाळी अंकाचे उत्स्फूर्त स्वागत केले. याप्रसंगी युनियनचे कार्याध्यक्ष सुनील साळवी, सरचिटणीस नरेंद्र सावंत, खजिनदार प्रमोद पार्टे तसेच पदाधिकारी हाशम धामस्कर, प्रकाश वाघमारे, मनोहर देरेकर, राजेश कांबळे, अमूल प्रभू, भार्गव धारगळकर, अशोक नवले, समीर तुळसकर, प्रवीण शिंदे, अमरेश ठाकूर, जनार्दन मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

को-ऑपरेटीव्ह बँक एम्पलॉईज युनियन माध्यमातून होत असलेल्या कार्याची संलग्नित सहकारी बँकांमधील कर्मचारी व अधिकारी वर्गाला माहिती कळण्यासाठी 'सहकार एकजूट' या त्रैमासिकाचे सातत्य गेली अनेक दशके संपादक आनंदराव अडसूळ यांनी सुरु ठेवले आहे. त्यामधील दिवाळी अंकाची साहित्यरूपी मेजवानी वाचक वर्गाला अनोखी भेट ठरत आहे. सौ. निलांबरी भोसले यांचा भारतातील कामगार चळवळीचा उदय आणि वाटचाल, विनोद हळदणकर यांचा ठेवीची






वृध्दी करेल बँकेची समृध्दी, सुधीर जाधव यांचा कर्ज मंजुरीबाबत, डॉ. महालक्ष्मी वानखेडकर यांचा हिंदू संस्कृती आणि प्रकृती, केतन पार्टे यांचा मुंबईतील हेरीटेज वास्तूंबाबत, गिरीश काळेकर यांचा छंद, रवींद्र भागवते यांचा झीरो, विनायक दळवी यांचा कमी खर्चिक पण आदर्श पॅरिस ऑलिम्पिक, लीलाधर चव्हाण यांचा खेळाडूरुपी हिऱ्यांना पैलू पाडणाऱ्यांच्या प्रतीक्षेत महाराष्ट्र आदी दर्जेदार लेख तसेच नरेंद्र वाबळे यांच्या चारोळ्या, प्रदीप म्हापसेकर यांची व्यंगचित्रे, सुनील भोवड यांचे शब्दखेळ आणि इतर वाचनीय साहित्यामुळे पूर्णपणे रंगीत स्वरूपाचा एकजूट दिवाळी अंक बहरला आहे. दिवाळी अंकाचे संपादक आनंदराव अडसूळ, कार्यकारी संपादक प्रमोद पार्टे व संपादकीय सल्लागार लीलाधर चव्हाण आहेत.

# घाटकोपरमध्ये दिवाळीनिमित्त कलासाधनेचे रांगोळी प्रदर्शन

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

दिवाळीनिम्मित रांगोळी प्रदर्शन ही कलाप्रेमींना खरे तर मेजवाणी असते. मात्र मुंबईत अपुऱ्या जागा, वाढलेला खर्च यामुळे रांगोळी प्रदर्शन भरविणे कठीण होत आहे. अश्या स्थिती मध्ये ही कलासाधना च्या वतीने घाटकोपर मध्ये अपुऱ्या जागेत ही देखणे रांगोळी प्रदर्शन आयोजित केले आहे.




प्रसिद्ध रांगोळीकार महादेव गोपाळे यांच्या मार्गदर्शनाखाली नवोदित रांगोळीकारांनी स्वतः ची पदर मोड करीत हे प्रदर्शन भरवले आहे. यात सामाजिक विषय, देविदेवता, प्रतिष्ठित व्यक्ती यांना श्रद्धांजली इत्यादी विषय या रांगोळयांमधून मांडण्यात आले आहेत.या कलेला मदत व्हावी अशी मागणी रांगोळीकरांनी केली आहे. गेली 49 वर्ष आम्ही 90 पेक्षा जास्त रांगोळी प्रदर्शन राज्यभर भरवली. मात्र आता पालिका प्रशासन आम्हाला मदत करत नाही म्हणून जागा मिळत नाही, अमाप खर्च वाढला असुन कलाकारांना स्वखर्चातून ही प्रदर्शने भरवावी लागत आहेत,

या कलेलं प्रदर्शनाला राज आश्रय मिळावा अशी आमची मागणी आहे. अशी प्रतिक्रिया या वेळी रांगोळीकार महादेव गोपाळे यांनी दिली आहे. हे प्रदर्शन दि 3 नोव्हेंबर पर्यंत सर्वांसाठी खुले असणार असून सर्व कलाप्रेमींनी या प्रदर्शनाला नक्की भेट द्यावी अशी विनंती कलासाधना च्या रांगोळीकारांनी केली आहे.

# महावितरणचा दिवाळीत लपंडाव

## नागरिक संतप्त, खाजगीकरणाची मागणी

**प्रतिनिधी**
**■ वसई**

दिवाळी सणाच्या गडबडीत महावितरणकडून वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने वसईतील नागरिक आणि व्यावसायिकांच्या आनंदावर विरजण पडले आहे. तांत्रिक बिघाडाचे कारण देत महावितरणने वीज पुरवठा नियमित न ठेवल्याने स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. त्यामुळे महावितरणचा कारभार खाजगी कंपनीकडे सोपवावा, अशी संतप्त मागणी नागरिकांकडून होत आहे.

सणाच्या काळात बाजारपेठा ग्राहकांनी गजबजलेल्या आहेत. मात्र वीज पुरवठा खंडित झाल्याने व्यवसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच नागरिकांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. दिवाळी सणाच्या वातावरणात वीज पुरवठा सुरळीत ठेवणे गरजेचे होते.मात्र महावितरणच्या अधिकाऱ्यांना सणाच्या महत्त्वाचा विसर पडल्यासारखे वाटत आहे. परिणामी नागरिकांमध्ये आणि व्यवसायिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

सणानिमित्त नातेवाईक गावी परतले असतान उष्णतेत वीज पुरवठा खंडित झाल्याने सर्वसामान्यांत संतापाचे वातावरण आहे. पहाटेदुपारी, रात्री वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक आणि व्यवसायिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महावितरणच्या सेवेत सुधारणा न झाल्यास ती खाजगी कंपनीकडे हस्तांतरीत करण्याची मागणी केली आहे.




*मुंबई: बेस्ट उपक्रमातील कामगारांना दिवाळीचा बोनस न दिल्यामुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे... याचाच निषेध म्हणून बेस्ट कामगार सेना परिवाराकडून सर्व बेस्ट आगारात असे फलकाद्वारे जाहीर निषेध करण्यात आला आहे.*

# दिवाळीच्या फराळाचे भाव गगनाला ; नागरिकांमध्ये नाराजी

**प्रतिनिधी**
**■ विरार**

वसई -विरार शहरात दिवाळी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी रंगबेरंगी रोषनाईच्या झळाळीने शहर लखाकत आहे. मात्र या दिवाळी सणाला महागाईचा फटका सहन करावा लागत आहे. पेट्रोल, डीझेल आणि खाद्य तेलाच्या वाढत्या किमतीने यावर्षी दिवाळी सणाला झळ बसली आहे.

मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी फराळाच्या पदार्थाच्या किंमतीत २० टक्क्यांनी वाढ पाहायला मिळाली आहे. महागाईमुळे नागरिकांना चांगलाच फटका बसला आहे. वसई तालुक्यात दिवाळी असल्याने नागरिकांत मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. शहरातील बाजारपेठा दिवाळीसाठी सजल्या आहेत. त्यात नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. परंतु,किंमती वाढल्यामुळे नागरिकांची चांगलीच पंचाईत झाली आहे.

मागील काही वर्षात फराळ तयार करून विकणे मोठा व्यवसाय बनला आहे. यात अनेक महिलांना चांगला रोजगार उपलब्ध झाला आहे. अनेक महिला बचत गटांनी आणि गृहिणींनी यात उडी घेवून व्यवसाय उभे केले आहेत. नोकरदार वर्गात या फराळाला चांगली मागणी आहे. पण यावर्षी कच्च्या मालापासून, अनेक पदार्थात तसेच घरगुती गॅस , खाद्य तेल आणि इतर जिन्नसांच्या किंमतीत मागील वर्षाच्या तुलनेने प्रचंड वाढ झाली आहे. यामुळे अनेक महिलांनी यावर्षी व्यवसायातून माघार घेतली आहे. विरारमधील महिला बचतगटाने माहिती दिली की, कोरोना काळापासून फराळाची मागणी घटली आहे. त्यात यावर्षी वाढत्या महागाईमुळे आगावू नोंदणी झालेली नाही. याबाबत बोलताना वसईच्या आम्रपाली यादव यांनी माहिती दिली की, किंमती वाढल्या असल्या तरी मागच्या वर्षीच्या तुलनेने काही प्रमाणात मागणी आल्या आहेत. नवरात्रीपासून दरवर्षी आगावू नोंदणी केली जाते. पण यावर्षी उशिरा ऑर्डर आल्या आहेत. पण त्यांचे प्रमाण कमी आहे. तसेच नेहमीपेक्षा कमी प्रमाणात लोक फराळ घेत आहेत.

# राऊतांना आरोप करण्याशिवाय कामच नाही - आ. दरेकर

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या माध्यमातून आमचे फोन आजही टॅप केले जात असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला. त्यांच्या या आरोपाला भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे. संजय राऊत यांना आरोप करण्याशिवाय काही काम नाही. अशा प्रकारचे कोण फोन टॅपिंग करत असेल असे अजिबात वाटत नाही. संजय राऊत फोन वरुन काही खळबळजनक बोलणार आहेत का? असा सवालही दरेकर यांनी उपस्थित केला आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना दरेकर म्हणाले की, संजय राऊत यांना आरोप करण्याशिवाय काही काम नाही. अशा प्रकारचे कोण फोन टॅपिंग करत असेल असे अजिबात वाटत नाही. संजय राऊत फोन वरुन काही खळबळजनक बोलणार आहेत का?त्याची त्यांना भीती वाटतेय. काही करत नाही तर घाबरण्याची काय गरज? संजय राऊत हे कांड करणारे नेते आहेत. निवडणुकीत काही भयानक करण्याचे त्यांच्या डोक्यात आहे का? त्या आधारे आपण फोनवरुन बोलू आणि पकडले जाऊ यासाठी अगोदरच थयथयाट केला की आपल्याला त्या गोष्टी सुरळीत करता येतात, असे राऊतांचे नियोजन असावे.

दरेकर पुढे म्हणाले की, विरोधकांच्या मनात निवडणुकीत काही विध्वन्सक करण्याचा डाव दिसतोय. त्यामुळे पोलीस प्रशासनावर दबाव आणून आपल्या गोष्टी निवडणुकीत सुरळीत करता येतील का? यासाठी हे आरोप सुरू आहेत. पोलीस पोलिसांचे काम करतील. परंतु आता आपण पराभूत होणार आहोत. महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला पाठिंबा दिल्याचे चित्र उभे राहिलेय मग आता खोटेनाटे आरोप करणे, कुंभाड रचणे यातून अशा प्रकारचे आरोप होत आहेत.

ठाकरे सेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी शायना एनसी यांच्यावर केलेल्या विधानावर बोलताना दरेकर म्हणाले की, अरविंद सावंत पारखी आहेत. त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यावर मी बोलू इच्छित नाही. महिलांचा अपमान करणारी वक्तव्य अरविंद सावंत यांच्याकडून येताहेत हे निषेधार्ह आहे. सावंत कधीच महिलांबाबतीत सहानुभूतीने बोलताना, महिलांचा आदर करताना दिसले नाहीत.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील 38 पोलीस निरीक्षकांची मुंबईत बदली

**प्रतिनिधी**
**■ वसई**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील ३८ पोलीस निरीक्षकांची मुंबई शहरात बदली करण्यात आली आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत.

बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये वसईतील विविध पोलीस ठाण्यांचे निरीक्षक समाविष्ट आहेत. मांडवी पोलीस ठाण्याचे संजय हजारे, तुळींजचे शैलेंद्र नगरकर, नायगावचे रमेश भामे, पेल्हारचे जितेंद्र वनकोटी, वालिवचे जयराम रणवरे, कुमारगौरव धादवड, नालासोपारातील सदाशिव निकम, आचोळेचे चंद्रकांत सरोदे, माणिकपूरचे राजू माने, वसईचे रणजीत आंधळे यांचा या बदल्यात समावेश आहे.तसेच, मिरा-भाईंदरमधील राजेंद्र कांबळे, विजयकुमार चव्हाण, बाळासाहेब पवार, विलास सुपे, दिलीप राख, सुधीर गवळी, प्रफुल्ल वाघ, विवेक सोनावणे, विजया पवार, राहुलकुमार पाटील, संजय केदारे, विठ्ठल चौगुले, सुधीर चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, ऋषिकेश पवळ, सागर टिळेकर, राहुल सोनावणे, मिलिंद साबळे, सचिन कोतमिरे, शिवानंद देवकर, जिलानी सय्यद, श्याम आपेट, मंगेश अंधारे, अब्दुलहक देसाई, अशोक कांबळे, संतोष चौधरी, जितेंद्र पाटील, प्रकाश मासाळ या पोलीस निरीक्षकांची देखील मुंबई शहरात बदली करण्यात आली आहे. या बदल्यांचा उद्देश निवडणुका शांततेत आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी आहे.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 133
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे**, E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - १३३
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## विद्यार्थ्यांसाठी किल्ले बांधणी प्रशिक्षण आणि प्रदर्शन

**मुंबई :** अस्मिता संस्था, जोगेश्वरीच्या वतीने दिवाळी सुट्टीत विद्यार्थ्यांसाठी २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान किल्ले बांधणी प्रशिक्षण शिबिर आणि प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षण सर्व वयोगटासाठी खुले होते. मातीशी असलेले आपले नाते, आपले अद्भुत किल्ले, त्यातील स्थापत्य शास्त्र, इतिहास आणि आपल्या शौर्यचे विविध पैलू नव्या पिढीला कळावेत या हेतूने तसेच त्यांचा वेळ सत्कारणी लागून आवड निर्माण करण्यासाठी अस्मिता संस्थेने हे शिबिर आयोजित केले होते. हे किल्ला प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. या उपक्रमात उपनगरातील अनेक शाळांतील १९८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र देऊन कौतुक केले. यावेळी कार्यवाह राजन चाचड, इतिहासप्रेमी गिरीश चित्रे, सुधीर गोरे, संतोष खाड्ये आणि कार्यकर्ते उपस्थितीत होते, अशी माहिती अस्मिता संस्थेच्या सांस्कृतिक विभागाचे संतोष खाडये यांनी दिली.



## थोडक्यात

### पीएसआय नरेंद्र पाटील सेवानिवृत्त



**मुंबई:** नरेंद्र बळीराम पाटील हे नियत वयोमानानुसार ३१ ऑक्टोंबर २०२४ रोजी ३७ वर्षाच्या सेवेनंतर पोलिस खात्यातून सेवानिवृत्त झाले. सेवा निवृत्तीच्या वेळी ते भोईवाडा पोलीस ठाणे येथे पोलिस उप निरीक्षक होते. अडलेल्या नाडलेल्यांच्या मदतीसाठी नेहमी तत्पर असलेले नरेंद्र पाटील यांनी आपल्या ३७ वर्षाच्या सेवेत पोलीस ठाणे नायगाव हेडक्वार्टर, गुन्हे शाखा, पायधुनी, येलोगेट, विशेष शाखा, डोंगरी, माटुंगा. या पोलिस ठाण्यात कार्यरत होते. सन २०२० मध्ये त्यांनापोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती मिळाली होती.

### मुलुंड मध्ये 'सप्तसुरांची व प्रकाशमय दिवाळी पहाट' कार्यक्रम संपन्न

**मुंबई:** मुलुंड सेवा संघाच्या वतीने माजी नगरसेवक श्री प्रकाश गंगाधरे यांनी "सप्तसुरांची व प्रकाशमय दिवाळी पहाट" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन कालिदास नाट्यगृह, येथे काल आयोजन केले होते. या कार्यक्रमाला भाजप नेते डॉ. किरीट सोमय्या आणि आमदार व मिहीर कोटेचा यांनी सदिच्छा भेट देत उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विवेक भागवत, ज्ञानदीप पतपेढी बँकेचे अध्यक्ष जिजाबा पवार, माजी नगरसेविका समिता कांबळे, मुलुंड जिमखानाचे अध्यक्ष चेतन साळवी, सतीश थत्ते, ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, एस. एस. बर्वे, सुरेश डावरे, सुधीर घाटे, चंद्रकांत पार्ले, संदीप साळवी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

### मुंबईत सिलेंडरचा स्फोट होऊन भीषण आग

**मुंबई:** शहरातील अंधेरी पूर्वेत असलेल्या एमआयडीसी परिसरात भंगारवाडीमध्ये चार ते पाच लाकडाच्या दुकानात मोठी आग लागली आहे. संध्याकाळी 7:30 च्या सुमारास एमआयडीसी भंगारवाडी परिसरात चार ते पाच गाळयात मोठी आग लागली. लाकूड गोदाममध्ये सिलेंडर ब्लास्ट झाल्यामुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. आजूबाजूला मोठ्या प्रमाणात गाळे आहेत, आणि या गाळात केमिकल आणि लाकूडचा गोदाम असल्यामुळे 8 ते 10 गाळयात आग वाढली आहे. आगीचे वृत्त समजताच स्थानिकांनी अग्निशमन दलास पाचारण केले. तसेच, परिसरातील नागरिकांनीही आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. या आगीत आठ ते दहा सिलेंडर ब्लास्ट झाल्याची माहिती आहे. आगीचे माहिती मिळताच अग्निशमन दलाचा पाच ते सहा गाड्या घटनास्थळावर दाखल होऊन आग आटोक्यात आणण्याचे काम युद्ध पातळीवर प्रयत्न करत आहे. या सर्व गोदामला मोठ्या संख्येमध्ये काम करणारे कामगार आहेत. काही कामगार बाहेर निघाल्याची माहिती मिळत आहे, तर काही कामगार आत अडकल्याचा भीती देखील व्यक्त केली जात आहे. आजूबाजूला जेवढे घर आहेत, जवळपास सर्व घरांमध्ये आग पसरत आहे. परिसरातील पंधरा ते वीस घर आणि गोदाम जळून खाक झाले.

# मी आता मंत्री झालो, त्यांनी आपला पक्ष बंद करावा !

## रामदास आठवलेंचा राज ठाकरेंना टोला

प्रतिनिधी
■ मुंबई



रामदास आठवलेंसारखे मंत्री व्हायचे झाल्यास मी माझा पक्ष बंद करेन, असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एका कार्यक्रमात म्हणाले होते. त्यांच्या विधानावर रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया देत मी आता मंत्री आहे, त्यामुळे त्यांनी पक्ष बंद करावा, असा पलटवार केला आहे. राज ठाकरे एका पक्षाचे नेते आहेत. मी कधी त्यांच्या विरोधात बोलत नाही. मी पँथर काळापासून संघर्ष केल्यामुळे मला मंत्रिपद मिळाले आहे. माझा गरिबांचा पक्ष आहे. आता मी मंत्री झालो आहे, तर राज ठाकरेंनी त्यांचा पक्ष बंद करावा, असा टोला आठवलेंनी लगावला.

महायुतीमध्ये जागावाटपात रामदास आठवले यांच्या रिपाइं पक्षाला केवळ एक जागा आली आहे. आरपीआयला एकच जागा मिळाल्याने कार्यकर्ते नाराज झाले होते. पण, मी त्यांची नाराजी दूर केल्याचे त्यांनी सांगितले. विधानसभेला आम्हाला एक जागा दिली असली तरी सत्ता आल्यावर एक विधानपरिषद आणि मंत्रीपद देऊ, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी दिल्याचे आठवले यांनी सांगितले.

ठाकरे सेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी शिंदे गटाच्या मुंबादेवी येथील उमेदवार शायना एन सी यांच्याविरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात येत आहे. यावर देखील आठवले यांनी प्रतिक्रिया दिली. अरविंद सावंत हे चांगले कल्चर असलेले खासदार आहेत, शायना एनसी यांच्याबाबत अपमानास्पद शब्द उच्चारणे गंभीर बाब आहे. त्यांचा अपमान म्हणजे सगळ्या महिलांचा अपमान आहे. उद्धव ठाकरे यांनी अरविंद सावंत यांच्यावर कारवाई करावी. सोबतच महिला आयोगाने देखील याची दखल घेऊन कारवाई करावी, अशी मागणी आठवले यांनी केली आहे.

### महायुतीसाठी निवडणूक सोपी

*रामदास आठवले यांनी विधानसभा निवडणुकीत महायुतीला किती जागा मिळणार यावरही भाष्य केले आहे. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी असा संघर्ष असला तरी महायुतीसाठी निवडणूक सोपी आहे. लोकसभेला फेक नरेटीव्हमुळे मोठे नुकसान झाले होते. पण लोकसभेला आम्हाला झालेले मतदान मोठे होते. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला १७० पर्यंत जागा मिळतील, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.*

# फटाके फोडण्याच्या वादातून तरुणाची हत्या

## मुंबईतील धक्कादायक घटना

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईत फटाके फोडण्यावरून वाद झाला आणि वाद वाढल्यानंतर एका २० वर्षीय तरुणाची चाकूने वार करून हत्या करण्यात आली. विवेक गुप्ता असे हत्या करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी अँटॉप हिल परिसरातील जय महाराष्ट्र नगरमध्ये ही घटना घडली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तरुणाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

मयत तरुण विवेक गुप्ता याच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. आरोपींमध्ये एका महिलेचाही समावेश आहे. इतर आरोपींचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. शंकर गल्लीत फटाके फोडत असताना तिथून आरोपी कार्तिक आर. मोहन देवेंद्र




याने दुसरीकडे फटाके फोडण्यास सांगितले. त्यावरून फटाके फोडणाऱ्यांचा कार्तिकसोबत वाद झाला. वाद हाणामारीपर्यंत पोहोचला पण, कार्तिक तिथून निघून गेला.

थोड्या वेळानंतर कार्तिक त्याची पत्नी, भाऊ आणि इतर काही लोकांसोबत तिथे आला. त्यांच्याजवळ काठ्या, क्रिकेट बॅट होती. त्यानंतर दोन्ही गटात वाद सुरू झाला. वाद सुरू असतानाच कुणीतरी चाकू काढला. झटापटीत चाकू खाली पडला. कार्तिक सोबत आलेल्या राज पुट्टी याने चाकू घेतला आणि विवेक गुप्तावर वार केले. परिसरातील लोकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी जखमी विवेक गुप्ताला रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. कार्तिक आर मोहन देवेंद्र, कार्तिक कुमार देवेंद्र, विक्की मुत्तू देवेंद्र, मिनियप्पन रवी देवेंद्र आणि कार्तिकची पत्नी यांना पोलिसांनी अटक केली आहे.

# महायुतीच्या नेत्यांच्या संपत्तीत प्रचंड वाढ

## ठाकरे सेनेच्या चतुर्वेदींनी मांडला लेखाजोखा



प्रतिनिधी
■ मुंबई

निवडणुकीसाठी उभ्या राहिलेल्या उमेदवाराला आपला अर्ज सादर करताना त्यांच्याकडे असलेल्या संपत्तीसोबतच वैयक्तिक आयुष्याची सुद्धा माहिती द्यावी लागते. पण सामान्य नागरिकांचे लक्ष असते ते नेतेमंडळीच्या संपत्तीकडे. विधानसभा निवडणुकीसाठी अनेक बड्या नेत्यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. या अर्जासोबतच त्यांनी आपल्या संपत्तीची देखील माहिती जोडली आहे. पण महायुतीच्या काही नेत्यांच्या संपत्तीत झालेली भरघोस वाढ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या प्रियांका चतुर्वेदी यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. त्यांनी महायुतीतील एकूण सात नेत्यांची नावे पोस्ट केली असून त्यांच्या संपत्तीत नेमकी किती वाढ झाली आहे, याबाबतची देखील माहिती दिली आहे.

ठाकरे शिवसेनेच्या नेत्या प्रियांका चतुर्वेदी यांनी महायुतीच्या गीता जैन, पराग शाह, राहुल नार्वेकर, प्रताप सरनाईक, तानाजी सावंत, दीपक केसरकर आणि धनंजय मुंडे यांच्या संपत्तीची माहिती सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. X या सोशल मीडिया साइटवरील अधिकृत अकाउंटवरून त्यांनी याबाबतची पोस्ट केली आहे. यामध्ये अपक्ष उमेदवार गीता जैन यांच्या नावाचा सर्वप्रथम समावेश असून जैन यांची २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ७०.४४ कोटी इतकी संपत्ती होती. मात्र, गेल्या पाच वर्षांमध्ये त्यांच्या संपत्तीत तब्बल ३२२ कोटी रुपयांनी वाढ झाली असून आता त्यांच्याकडे ३९२.३० कोटी इतकी संपत्ती आहे. तर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची २०१९ मध्ये ३८.०९ कोटी रुपयांची संपत्ती होती. पण गेल्या पाच वर्षांमध्ये त्यांच्या संपत्तीचा आकडा १२९.८१ कोटी रुपयांवर जाऊन पोहोचला आहे.

राज्यातील सर्वात श्रीमंत आमदार असलेल्या पराग शाह यांची संपत्तीही कैकपटीने वाढली आहे. 2019 च्या विधानसभा निवडणुकीत पराग शाह यांची संपत्ती ५००.६२ कोटी इतकी होती. तर आता २०२४ च्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात पराग शाह यांच्या संपत्तीचा आकडा ३३८३.०६ कोटी रुपये इतका नमूद करण्यात आला आहे. ज्यामुळे पराग शाह हे हजारो कोटींचे मालक बनले आहेत. तर प्रताप सरनाईक यांची २०१९ मध्ये १४३.९७ कोटी इतकी संपत्ती होती, मात्र आता २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या प्रतिज्ञापत्रात त्यांची संपत्ती ३३३.३२ कोटी इतकी नमूद करण्यात आली आहे.

# एफ/दक्षिण विभागात अपुरा पाणीपुरवठा जलअभियंता मालवदे यांना नागरिकांचा घेराव

प्रतिनिधी
■ मुंबई



या वर्षी पुरेसा पाऊस झाल्याने. मुंबईला पाणी पुरवठा करणारे तलाव बऱ्यापैकी भरले आहेत. पण तरीही मुंबईतील अनेक भागात पाण्याची समस्या लोकांना भेडसावत आहे. एफ दक्षिण विभागात ही अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने गुरूवारी पालिकेच्या जल विभागाच्या अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला.

यापूर्वी आमदार अजय चौधरी यांच्या नेतृत्वाखाली एफ/ दक्षिण विभाग कार्यालयावर भव्य हंडा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळेस एफ/दक्षिण विभागाचे सहाय्यक आयुक्त पाटील आणि उपजल अभियंता खिल्लारी यांनी चार दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत बैठक घेऊन नियोजन करू, असे आश्वासित केले होते.पण पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही, म्हणून गुरूवारी आ. अजय चौधरी यांच्या सूचनेवरून माजी नगरसेवक अनिल कोकीळ यांनी प्रभाग क्रमांक २०२ आणि २०४ येथील नागरिक आणि पदाधिकाऱ्यांसमवेत जल अभियंता माळवदे यांच्या कार्यालयात त्यांना घेराव घालून पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करा. असा आग्रह धरला. दोन तास झालेल्या चर्चेनंतर त्यांनी तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत शिष्टमंडळासमोरच दूरध्वनीद्वारे आदेश दिले.

यावेळी शाखाप्रमुख विजय इंदुलकर किरण तावडे,कांचन घाणेकर,आणि प्रवीण पाठक, प्रकाश, विलास कुडतरकर, तानाजी बागल, गणेश रुके, राजन आबिटकर,प्रदीप पाताडे, मंगेश पिंगळे, मधुकर नरे, मनोज वाघरे, सुनीता सावंत, मिलिंद वासकर, पुंडलिक सावंत,रमेश रजपूत, प्रशांत गुलगुले,बबन सकपाळ, राजन पार्टे,अजय महाडिक, मंगेश चव्हाण, अमोल दळवी, खानविलकर,प्रकाश सावंत, अरविंद आडविलकर, सुबोध सावंत, घोसाळकर,आणि पदाधिकारी तसेच विविध इमारतीमधील कार्यकर्ते उपस्थित होते.

# एमबीबीएस प्रवेशाबाबत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग आक्रमक

प्रतिनिधी
■ मुंबई

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एमबीबीएस अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची तपशीलवार माहिती सादर करण्याचे निर्देश वैद्यकीय महाविद्यालये आणि संस्थांना दिले आहेत. विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमानुसार झाले आहेत का ? वैद्यकीय महाविद्यालयाची प्रवेश क्षमता, विद्यार्थ्यांची पात्रता, वयोमर्यादा, पात्रता गुण आदी बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात आले आहे का ? हे तपासण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने वैद्यकीय महाविद्यालये व संस्थांना वरील आदेश दिले आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांना या विद्यार्थ्यांची तपशीलवार माहिती ८ नोव्हेंबरपर्यंत सादर करावी लागणार आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या कायद्याच्या तरतुदींनुसार आणि पदवीधर वैद्यकीय शिक्षण नियम २०२४ द्वारे अधिसूचित राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा (नीट) आधारित प्रक्रियेनुसार निवड करणे आवश्यक असते. त्यासाठी महाविद्यालयांची मंजूर प्रवेश क्षमता, पात्रता, वयोमर्यादा, पात्रता गुण, समुपदेशन आदी मानके निश्चित करण्यात आली आहेत. या मानकांनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली आहे का ? हे तपासण्यासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची इयत्ता बारावीची गुणपत्रिका, नीट परीक्षेचा निकाल, आकारण्यात आलेल्या शुल्काचा तपशील याचबरोचर महाविद्यालयांमधील जागा, महाविद्यालयाची श्रेणी, अल्पसंख्याक, जागांचा तपशील, खाजगी महाविद्यालयांच्या बाबतीत सहमती करार आदी तपशील सादर करण्याचे आदेश राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने सर्व वैद्यकीय महाविद्यालये व संस्थांना दिले आहेत.



राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने वैद्यकीय प्रवेश नियमानुसार एमबीबीएसच्या प्रवेशांवर लक्ष ठेवण्यासाठी ऑनलाईन प्रणाली सुरू केली आहे. या ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून एमबीबीएस अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा तपशील युनिक लॉगिन आयडीद्वारे ८ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत सादर करण्याच्या सूचना आयोगाने सर्व वैद्यकीय महाविद्यालये व संस्थांना दिल्या आहेत. मात्र त्यानंतर कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालय व संस्थांना विद्यार्थ्यांचे तपशील सादर करण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने स्पष्ट केले आहे. ऑनलाईन माध्यमातून सादर केलेल्या या तपशीलाची राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग पडताळणी करण्यात येते. यामध्ये काही गैरप्रकार आढळल्यास संबंधित महाविद्यालयावर कारवाई करण्यात येते.

### हे तपशील मागण्यात आले आहेत

*इयत्ता १२ वीची गुणपत्रिका, स्पर्धात्मक प्रवेश परीक्षेचा तपशील, नीट परीक्षेचा हजेरी क्रमांक, राज्य कोटा, केंद्रीय कोटा, एनआरआय कोटा, प्रवेश घेतल्याची तारीख, जातीचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे मागवण्यात आली आहेत. तर परदेशी विद्यार्थ्यांची इयत्ता बारावीची गुणपत्रिका, भारतीय विद्यापीठांच्या असोसिएशनने जारी केलेले समतुल्य प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.*

# पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सपत्नीक दिली सफाई कर्मचाऱ्यांच्या वसाहतीला भेट



प्रतिनिधी
■ मुंबई

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक .भूषण गगराणी यांनी शुक्रवारी सकाळी दादर , कासारवाडी येथील महानगरपालिका सफाई कर्मचाऱ्यांच्या वसाहतीला सपत्नीक सदिच्छा भेट दिली. मुंबईच्या दैनंदिन स्वच्छतेत मोलाचे योगदान देणाऱ्या सफाई कर्मचारी वर्गाचे आणि त्यांच्या कुटुंबाचे आयुक्त यांनी आभार मानत त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

कर्मचाऱ्यांसोबत महानगरपालिका आयुक्त गगराणी यांनी दिवाळीचा फराळही केला. कासारवाडी परिसर स्वच्छ सुंदर आणि इतर सोयीसुविधांबाबत आयुक्त गगराणी यांनी समाधान व्यक्त केले.

कासारवाडी भागात महानगरपालिका आयुक्त यांनी सपत्नीक दीपावली निमित्त भेट दिल्याबद्दल सफाई कर्मचारी वर्गाने आणि त्यांचा कुटुंबीयांनी भारावून जाऊन आयुक्तांचे आभार मानले.

# कुलाब्यात सापडला 10 कोटी डॉलर्सचा परदेशी चलनाचा साठा

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर सध्या राज्यात आचारसंहिता लागू आहे. मात्र त्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम सापडून येत आहे. याआधी पुणे, पालघर आणि उल्हासनगरमधून रोकड जप्त करण्यात आली आहे. अशातच आता मुंबईच्या कुलाबामधून एक खळबळ उडवणारी बातमी समोर येत आहे. कुलाब्यातून तब्बल 10 कोटी किमतीचे डॉलर्स जप्त करण्यात आले आहेत.

मरीन ड्राईव्ह येथील कैवल्यधाम परिसरात निवडणूक आयोगाच्या विशेष पथकाला नाकाबंदी दरम्यान, एका लॉजिस्टिक कंपनीच्या वाहनाची तपासणी केली. यावेळी वाहनात सुमारे 10 लाख डॉलर्स (भारतीय मूल्य अंदाजे 9 कोटी रुपये) सापडले आहेत. प्राथमिक तपासणीमध्ये हे पैसे एका बँकेच्या फंडाचा भाग असल्याचा दावा वाहनातील कर्मचाऱ्यांनी केला आहे. वाहनातील कर्मचाऱ्यांनी कस्टम विभागाची परवानगी दाखवली. तसेच ही रक्कम विमानतळावरून एका बँकेच्या शाखेकडे घेऊन जात होता, असेही म्हटले आहे. राज्यात सध्या आचारसंहित लागू असताना एवढी मोठी रक्कम सापली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या पथकाने खातरजमा करण्यासाठी संबंधित वाहन आणि त्यातील रोख रक्कम कस्टम विभागाच्या ताब्यात दिली आहे.

पश्चिम रेल्वे
दुरुस्ती काम
वरी. डीईएन (दक्षिण) मुंबई सेन्ट्रल, ई-निविदा सूचना क्र: बीसीटी/२४-२५/१९७ दि. २८.१०.२०२४ मागवित आहेत. काम आणि ठिकाण: चर्चगेट – विरार अनुभाग: एडीईएन (टी/एस) पीएल अंतर्गत एसएसई (पी.वे) दादर आणि अंधेरी येथे पी. वे ची दुरुस्ती. कामाचे अंदाजे मूल्य रु. मध्ये: रु. ६,१७,१४,१४२.९०. इरठे: रु. ४,५८,६००.०० सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: २६.११.२०२४ रोजी १५:०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २६.११.२०२४ रोजी १५:३० वा. अधिक तपशिलासाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. ०६९१
आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

ANNEXURE 47
FORMATS C-1 TO C-8 and CA
Format C-1
(for candidate to publish in Newspapers, TV)

Declaration about criminal cases
(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) NO.536 Of 20211 (Public Interest Foundation & ORS. Vs. Union of India & Anr.) Name and address of candidate : Sadanand Shankar Sarvankar, 1073 SHIVKUPA NEW PRABHADEVI ROAD PRABHDEVI MUMBAI - 400025
Name of political party : SHIVSENA
(Independent candidates should write "Independent" here)
Name of Election : GENERAL ELECTION TO THE LEGISLATIVE ASSEMBLY IN THE STATE OF MAHARASHTRA - 2024
I SADANAND SHANKAR SARVANKAR (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare
For public information the following details about my criminal antecedents:

(A)Pending criminal Cases

| SI. No. | Name of Court | Case No.and dated | Status of Case (s) | Section (s) of acts concerned and brief description of offence (s) |
|---|---|---|---|---|
| 1. | CITY CIVIL COURT (S.C.No-821/2022 | FIR NO-249/2005 DADAR POLICE STATION 06/06/2023 | Political Case | 143,144,145,147,149,353,332 of IPC 37 (3) 135 MPA |
| 2. | 5th Court Bhoiwada (shiwree) Case No - 3035/PS/2023 | FIR NO-571/22 DADAR POLICE STATION Date: Not Applicable | Political Case | 143,144,145,147,148, 149, 336, 186, 504,506, of IPC-Read With 3, 25 (9)30 Indian Weapon IPC Read With.37 (1) 135 MPA |

(B)Details about cases of conviction for criminal offences

| SI.No. | Name of Court & date(s) of order(s) | Description of office (s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| NA | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.

लोखंडाचा नाश कोणीही करू शकत नाही, पण त्याचा स्वत:चा गंज त्याला नष्ट करू शकतो. त्याप्रमाणे, माणसाला कोणीही नष्ट करू शकत नाही, पण त्याची स्वत:ची मानसिकता त्याला नष्ट करू शकते.



- रतन टाटा


वृत्तमानस
मुंबई, शनिवार, ०२ नोव्हेंबर २०२४

# पर्यावरणाची काळजी घेऊ या!

वातावरणीय सतत होणारे बदल, तापमानात होणारी वाढ लक्षात घेता पर्यावरण पूरक उत्पादनाची निकड भासू लागली आहे. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा प्रसार करणे सध्याच्या काळात गरजेचे आहे. वातावरण बदलांचा सामना करण्यासाठी अशी जीवनशैली एखाद्याने आत्मसात करायचे ठरवले तर तशी उत्पादने बाजारात असणे आवश्यक आहे. यासाठी नुकतेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने इकोमार्क देण्याच्या संबंधीचा निर्णय घेतला असून त्याचे स्वागतच केले पाहिजे. उशिरा का होईना सरकारला याबाबत जाग आली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे गेल्या काही काळात जगभरातील असा एकही भूप्रदेश उरला नाही जिथे वातावरण बदलाचा फटका बसला नाही. तीव्र हवामान बदल व अनिश्चित स्वरूपाचे ऋतू आता नेहमीचीच समस्या होऊन बसली आहे.या समस्यांपासून बचावासाठी सर्वच स्तरांतून प्रयत्न केले जात आहेत. जागतिक स्तरावर जे प्रयत्न सुरू आहेत त्यात भारत नेहमीच अग्रेसर राहिला आहे. त्यातच आता पडलेली नवी भर म्हणजे पर्यावरण पूरक उत्पादनांसाठी इकोमार्क देण्याचा घेण्यात आलेला निर्णय. हा निर्णय भविष्यासाठी एक रोडमप ठरू शकतो. पर्यावरणाचे रक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्याची आपली जबाबदारी उद्योजकांनीही ओळखली जाणे आवश्यक आहे. त्याचाच एक भाग म्हणजे अशी पर्यावरण पूरक उत्पादने. अर्थात यासाठी इको मार्क हे अभियान आवश्यक बनलेले आहे. आपल्या उत्पादनांची निर्मिती करताना शक्यतो निसर्गाची हानी पोहचेल असे रासायनिक घटक ते वापरत नाहीत. वापरले तरी त्यांची विल्हेवाट निसर्गाची हानी होणार नाही अशा पध्दतीने केली जात असल्याचे सांगण्यात येते. त्याचप्रमाणे असे उद्योजक आपल्या संस्थेतील कामगारांबद्दलही जागरूक असतात. निसर्गाचे शोषण होणार नाही हे पहात असतानाच ते मनुष्यबळाचे शोषण होणार नाही हे पहातात. आपल्या देशात असे नव उद्योजक आता तयार होत असून त्यामध्ये येत्या काही काळात भर पडू शकते. ग्राहकांमध्ये पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर वाढावा यासाठी प्रोत्साहन मिळण्यास यामुळे मदत होऊ शकते. इकोमार्क असलेल्या उत्पादनांच्या माध्यमातून पर्यावरणास कमीतकमी हानी पोहोचण्याची शक्यता आहे. यातून होणारा सर्वात महत्वाचा फायदा म्हणजे, उत्पादकांना पर्यावरणपूरक उत्पादने बनवण्यासाठी प्रोत्साहन मिळेल व जास्तीत जास्त उत्पादने बाजारात पर्यावरणपूरक येण्यास मदत होईल. यातून जास्तीत जास्त पर्यावरणपूरक उत्पादनांना मागणी वाढेल व त्या पद्धतीची जीवनशैली तयार होण्यास मदत होण्याचा अंदाज आहे. इकोमार्क संबंधी असलेला आणखी एक महत्वाचा निर्णय म्हणजे ज्या उत्पादनांना आधी प्रमाणपत्र मिळाले आहे त्याच उत्पादनांचा विचार इकोमार्क देण्यासाठी करण्यात येईल. तसेच ज्या उत्पादनाला इकोमार्क नाही अशांना लावण्यास परवानगी देखील नाही. इकोमार्क निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी इकोमार्क पोर्टल स्थापन करण्यात येणार आहे. तसेच सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने याविषयी जनजागृती सोशल मीडियाच्या व अन्य जाहिरातींच्या माध्यमातून करण्याची जबाबदारी अपेक्षित आहे. कोटिंगसाठी वापरण्यात येणारी पावडर, बांधकामाचे रंग, सौंदर्य प्रसाधने, पॅकेजिंग साधने, खाद्यपदार्थ, साबण व डिटर्जंट, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कागद, प्लास्टिक उत्पादने, वस्त्र, ज्यूट व त्यापासून बनवली जाणारी उत्पादने इत्यादी यांचा समावेश या इकोमार्क निर्णयात करण्यात आला आहे. या सगळ्या उत्पादनानुसार व ती उत्पादने कोणत्या प्रकारच्या प्रदूषणास कारणीभूत ठरत आहे यानुसार त्यांना इकोमार्क देण्यात येणार आहेत. अपारंपरिक ऊर्जा ही अमर्यादित, पर्यावरणपूरक आणि प्रदूषणविरहित आहे. वीज बचतीची सवय वाढवण्याची गरज असताना पर्यावरणपूरक वीज निर्मितीसाठी अधिकाधिक स्रोत निर्माण करणे काळाची गरज आहे. जागतिक तापमान आणि हवामान बदलामुळे वातावरणाचा समतोल बिघडत चालला असून अशा स्थितीत पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोतांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. पुढच्या पिढीला अंधारात राहण्याची वेळ येऊ नये यासाठी आतापासूनच आपल्या दैनंदिन व्यवहारात ऊर्जाबचतीची सवय लावून घ्यावी लागणार आहे. वीज ही कोणत्याही देशाच्या विकासाचे इंजीन समजली जाते. एखाद्या नागरिकाकडून वीजेचा, ऊर्जेचा किती आणि कसा वापर होतो यावरून तेथील जीवनशैलीचा स्तर समजतो. एवढेच नाही तर आर्थिक विकासाचा थेट संबंध वीज वापराशीही असतो. त्यामुळे भारतासारख्या वेगाने विकसित होणार्या अर्थव्यवस्थेसाठी वीज क्षेत्रात आत्मनिर्भर असणे गरजेचे आहे. वाढत्या लोकसंख्येचा उदरनिर्वाहासाठी आणि सुविधांसाठी वीज स्रोतांची मागणी वाढली आहे, हे देखील तितकेच खरे. परिणामी जगाला आणि पर्यायाने नागरिकांना प्रदूषण आणि हवामान बदलासारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशावेळी वाढती लोकसंख्या आणि वीज उपलब्धता यांच्यात समतोल कसा साधता येईल ? पर्यावरण संतुलन आणि नवीन पिढीसमोरील संभाव्य आव्हाने पाहता भारताची आगामी काळातील रणनीती कशी असेल? हे देखील पाहणे महत्त्वाचे आहे. जगभरात गेल्या काही दशकांपासून लोकसंख्या वेगाने वाढत चालली आहे आणि त्यानुसार वीजेला देखील मागणी वाढतच चालली आहे. ज्या रितीने वीजेची वाढती मागणी पाहता भविष्यात ऊर्जेचे पारंपरिक स्रोत नष्ट होण्याची शक्यता वाढत चालली आहे. अशी स्थिती जर उद्भवली तर मानवाच्या अस्तित्वाचाही कालांतराने प्रश्न निर्माण होऊ शकतो. या कारणामुळे भविष्यातही वीजेची उपलब्धता सुरळीत राहवी आणि स्रोत कमी होऊ नयेत यासाठी जगभरात ऊर्जाबचतीकडे विशेष लक्ष देण्याबाबत विचार केला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, २०४० पर्यंत जगभरात वीजेची तब्बल ५० टक्क्याने मागणी वाढेल. अर्थात दैनंदिन जीवनाच्या उपयोगासाठी जीवाश्म इंधन, कच्चे तेल, कोळसा, नैसर्गिक गॅस आदी स्रोतांच्या माध्यमातून वीजेचे पुरेसे उत्पादन केले जात आहे. परंतु मागणीतील वाढ पाहता भविष्यात हे पारंपरिक स्रोत कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, किंबहुना ते स्रोत आटण्याचीच भीती आहे. यामुळेच आता भारतासह जगभरात शाश्वत ऊर्जेच्या स्रोतांची मागणी वेगाने वाढत चालली आहे. पर्यावरण संरक्षण आणि वीज टंचाई यासारख्या आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी शाश्वत ऊर्जा हा एक चांगला पर्याय राहू शकतो. तो पर्यावरणपूरक असण्याबरोबरच वीजेची गरज भागवण्यासाठी देखील उपयुक्त राहू शकतो. वीजेची गरज भागवण्यासाठी, पर्यावरण वाचवण्यासाठी आणि कोळशावर ची अवलंबिता कमी करण्यासाठी शाश्वत ऊर्जा जसे की पवन ऊर्जा, सौर ऊर्जे चा सक्षमपणे वापर करणे फायद्याचे राहू शकते. प्रत्यक्षात कोणत्याही देशासाठी वीज वाचवणे आणि बचतीचा अर्थ म्हणजे सध्याच्या काळात आणि भविष्यातही पर्यावरणाला हानी न पोचवता वीज उपलब्ध करून देण्यासाठी अंगिकारलेली सवय होय आणि ती सवय कायमस्वरुपी असावी, अशी अपेक्षा आहे. भारताकडे यासाठी पुरेसे स्रोत आहेत. सरकारकडून या स्रोतांचा विकास केला जात आहे. आजही आपण सर्वांनी शाश्वत ऊर्जेचा वापर करणे गरजेचे आहे आणि यासाठी एकमेकांना प्रोत्साहन करण्याची आवश्यकता आहे. ऊर्जा बचतीला एखाद्या राष्ट्रीय अभियानाचे रूप द्यायला हवे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेगाने विकास होत आहे. कोणत्याही अर्थव्यवस्थेसाठी वीज आणि अर्थ हे इंधनाचे काम करतात. आर्थिक अडचणींमुळे विजेच्या चालना मिळू शकत नाही. जशा स्थितीत गुंतवणूकदार भारतीय ऊर्जा क्षेत्राकडे एक आकर्षक गुंतवणुकीची संधी म्हणून पाहत आहेत. त्याचा पूर्ण फायदा घेण्यासाठी भारताला नव्या ऊर्जास्रोतांना चालना द्यावी लागेल. परंतु यासाठी वीजेच्या क्षेत्रात आत्मनिर्भर होताना अनेक आघाड्यांवर काम करण्याची गरज आहे.

# बलिप्रतिपदेमागील व्यापक दृष्टिकोन!

कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिपदा असे म्हटले जाते. या दिवसाला पाडवा म्हणूनही संबोधले जाते. या दिवसापासून व्यापाऱ्यांचे नवीन वर्ष सुरु होते त्यामुळे या हिशोबाच्या नवीन वह्यांचे पूजन करण्याची प्रथा आहे. याच दिवशी सवाष्ण स्त्री आपल्या पतीचे औक्षण करते. या दिवशी माता पार्वतीने भगवान शंकराला द्यूत खेळात पराभूत केले होते त्यामुळे या दिवसाला द्यूत प्रतिपदा असेही म्हटले जाते. बलिप्रतिपदेमागील पौराणिक कथा आपणा सर्वांनाच ठाऊक आहे. भक्त प्रल्हादाचा नातू आणि विरोचनाचा पुत्र बली हा असुरांचा राजा होता. राक्षसकुळात जन्म घेऊनही तो स्वार्थांध आणि मदांध नव्हता. प्रजाहितदक्ष आणि दानशूर राजा म्हणून त्याची त्रिलोकात कीर्ती होती. त्याच्याकडे आलेली कोणतीही व्यक्ती रिकाम्या हाताने परतत नसे. बली राजा जितका चारित्र्यवान आणि दानशूर होता तितकाच तो शूरवीर होता. शौर्याने त्याने देवांनाही पराभूत केले. लक्ष्मीसह त्याने देवांना बंदी केले होते. त्याच्याकडे आलेल्या अतिथीला तो मागेल ते दान देत असे परिणामी त्याच्या या दानशूरतेचा अनेक जण गैरफायदा घेऊ लागले. धर्मशास्त्रानुसार दान हे नेहमी सत्पात्रे असावे. चुकीच्या माणसाला दान केले तर तो संपत्तीमुळे उन्मत्त होऊ शकतो, आयत्या मिळालेल्या संपत्तीचा दुरुपयोग करू शकतो. ज्याचे पातक दान करणाऱ्यालाही लागते. बळीराजाच्या बाबतीतही असेच झाले,



एकदा बळीराजाने एका यज्ञाचे आयोजन केले होते. यज्ञानंतर दानधर्म केला जातो. भगवान श्री विष्णूने मुंजा मुलाचा म्हणजेच वामनावतार धारण केला. 'ॐ भवति भिक्षां देही ।' म्हणत वामनाने बलीराजाकडे भिक्षा मागितली. बळीराजाने "काय हवे ?" विचारल्यावर वामनाने त्रिपाद भूमीदान मागितले. 'वामन कोण आहे आणि या दानामुळे काय होणार आहे याचे बळीराजाला भान नसल्याने त्याने लगेचच त्रिपाद भूमी वामनाला दान दिली. तत्क्षणी वामनाने विराटरूप धारण करून एका पावलाने संपूर्ण पृथ्वी व्यापून टाकली. दुसऱ्या पावलाने अंतरिक्ष व्यापले अन् त्याने "तिसरे पाऊल कोठे ठेवू ?", असे बलीराजाला विचारले. तिसरे पाऊल ठेवायला काहीच शिल्लक न राहिल्याने बली राजाने तिसरे पाऊल त्याच्या मस्तकावर ठेवण्यास सांगितले. त्याच्या या शरणागतीवर प्रसन्न होऊन वामनाने "तुला काही वर मागावयाचा असेल तर माग असे त्याला सांगितले. 'आता पृथ्वीवरील माझे सर्व राज्य संपणार आहे आणि आपण मला पाताळात घालविणार आहात, तेव्हा तीन पावले टाकण्याचे जे सर्व घडले, ते पृथ्वीवर प्रतिवर्षी तीन दिवस तरी माझे राज्य म्हणून ओळखले जावे अशी विनंती त्याने वामनाकडे केली. ते तीन दिवस म्हणजे आश्विन कृष्ण चतुर्दशी, आश्विन अमावास्या आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा. याला 'बलीराज्य' असे म्हणतात. ज्याला आपण दिवाळी म्हणतो. या दिवसांत ' 'इडा पीडा टळो आणि बलीचे राज्य येवो' अशी प्रार्थना केली जाते.

बली राजाच्या या पाताळ गमनाच्या कथेबाबत अनेकांच्या मनामध्ये गैरसमज आहेत. बली राजाच्या काळात समस्त जनता अत्यंत गुण्यागोविंदाने नांदत होती. सर्वत्र सुख समृद्धी होती. असे असतानाही श्रीविष्णूने घात करून बली राजाचा वध केला असा अपप्रचारही काही नास्तिक विचारसरणीच्या मंडळींकडून केला जातो. बली राजा हा दानशूर असला तरी त्याच्या दानशूरतेचा अनेकांनी अपलाभ करून घेतला. अपात्र लोकांच्या हाती संपत्ती गेल्याने त्या संपत्तीच्या बळावर त्यांनी इतरांना त्रास देण्यास सुरुवात केली. लोकांनी धर्माचरण करणे सोडून दिले. लोक मनाला हवे तसे वागत होते. सुखोपभोगांमध्ये लीन राहत होते, हे असेच चालू राहिले असते तर कालांतराने सृष्टीचे संतुलन बिघडले असते. परिणामी भविष्यात मोठे संकट ओढवले असते. बली राजाने देवी लक्ष्मीला बंदिस्त केले होते म्हणून त्याच्या कैदेतून देवीची सुटका करणेही महत्वाचे होते. बली राजाला रोखने क्रमप्राप्त असल्यानेच श्री विष्णूने मुंजा मुलाचे रूप धारण करून बली राजाला पातालात धाडले आणि त्याचा सार्वत्रिक उद्धार केला. राक्षस कुळात जन्माला येऊनही आज बली राजाची सर्वत्र पूजा केली जाते कारण दैत्यासुर असूनही बली राजामध्ये राक्षसाचे कोणतेच अवगुण नव्हते. त्याची वृत्ती अत्यंत सात्विक होती. म्हणूनच त्याने आपल्या प्रजेचा चांगला सांभाळ केला. आपल्या दानी आणि शौर्यामुळे त्याने तिन्ही लोकी लौकिक मिळवला. ईश्वरी कार्य समजून जनतेची सेवा केली त्यामुळेच त्याचा उद्धार करण्यासाठी श्री विष्णूंना अवतार घ्यावा लागला. श्री विष्णूंची त्याने कृपा संपादन केली. बली राजाला पाताळात धाडून श्री विष्णूंनी भोगविलासात मग्न झालेल्या जनतेला वास्तवात आणले. त्यांच्याकडून पापकर्म होण्यापासून त्यांना वाचवले. त्यामुळे वामनावतार घेऊन श्री विष्णूने बली राजावर अन्याय केला नसून त्याचा उद्धारच केला आहे.

बलीप्रतिपदेच्या दिवशी जमिनीवर पंचरंगी रांगोळीने बली आणि त्याची पत्नी विंध्यावली यांची चित्रे काढून त्यांची पूजा करतात. यानंतर बलीप्रीत्यर्थ दीप अन् वस्त्रे यांचे दान करतात. श्री विष्णूंनी बलीला दिलेल्या वचनानुसार दिवाळीतील या तीन दिवसांत यमदीपदान केल्याने अपमृत्यूचे संकट टळते. धर्माने वागणाऱ्याकडे श्री लक्ष्मी वास करते. आपण कोणत्या कुळात आणि कोणत्या परिस्थितीमध्ये जन्माला आलो आहोत या गोष्टी गौण आहेत. आपल्या कर्तृत्वाने आणि दातृत्वाने भगवंताची कृपा संपादन करता येते. जीवनाचा उद्धार करता येतो हीच शिकवण बलिप्रतिपदेची कथा आपल्याला देते.

**जगन घाणेकर, मुंबई**

# प्रदूषणाचा भस्मासुर रोखा

देशाची राजधानी असलेली दिल्ली आता प्रदूषणाचीही राजधानी बनली आहे. दिल्लीतील प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. रविवारी राजधानी दिल्लीतील हवेचा दर्जा निर्देशांक ( ए क्यू आय ) ४०० हून अधिक नोंदवला गेला त्यामुळे दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर बनले आहे. अर्थात ही काय भूषणावह बाब नाही उलट यामुळे देशाची मान खाली झुकली आहे अर्थात त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही दिल्लीतील प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाय करा असा अनेक सामाजिक व सेवाभावी संघटनेने सरकारला इशारा दिला होता मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. केवळ दिल्लीतच नाही तर दिल्लीसह देशातील अकरा शहरांची ए क्यू आर म्हणजे हवेची गुणवत्ता ३०० च्या वर नोंदवली गेली. मुंबई शहरातील हवेची गुणवत्ता देखील खालावली असून मुंबई शहरावर धुक्याची चादर पसरली असून आग्र्याचा ताजमहालालाही प्रदूषणामुळे धोका निर्माण झाला आहे.

मागील वर्षी स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल प्रसिद्ध केला होता. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक होता कारण या अहवालात भारत जगातील आठव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून दिल्ली जगातील चौथ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर असल्याचे नमूद करण्यात आले होते व त्याच अहवालात प्रदूषित शहरांच्या यादीत चौथ्या क्रमांकावर असलेली दिल्ली लवकरच पहिल्या क्रमांकावर पोहचेल असा इशाराही दिला होता. अवघ्या वर्षभरात त्यांचा इशारा खरा ठरला. स्विस संस्थेने तयार केलेल्या या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३१ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली होती. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले आहे.

आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची किती वाईट अवस्था झाली आहे हे आपण पाहत आहोतच. मागील वर्षी प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली आली होती. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे.

प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे.

स्विस संस्थेने जाहीर केलेला अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

**श्याम ठाणेदार, पुणे**

## पत्र मानस

### आता तरी पेन्शनवाढ व्हावी

"आयुष्मान भारत" ही योजना ७० वर्षा वरील ज्येष्ठ नागरीकांना ५ लाख रू पर्यंत आरोग्य विमा कवच जाहीर केले आहे. तरी असंघटित क्षेत्रातील पेंशनर अजुनही दुर्लक्षित आहेत. पेन्शन चे मोल पैशात नसून, म्हातारपणात हातात असणारी काठी आहे. देशातील कर्मचाऱ्यांच्या म्हातारपणात अनेक योजना उपलब्ध आहे. इ पी एस ही कल्याणकारी योजना १९९५ साली अमलात आली. पेन्शनसाठी कामगार आणि व्यवस्थापन ह्यांचे योगदान आहे. देशाचा, राज्याचा विकास होतो, ते वैभव असते. कष्टकरी कामगारांचे हात राबलेले असतात. पेंशनरांना केंद्र सरकार तर्फे पेन्शनवाढीचे आश्वासन दिले असुनही, कोशीयारी समिती प्रमाणे पेन्शनवाढ करीता, गेली १२ वर्ष पेन्शनर संघटना आंदोलनं करीत आहेत. खासदार मागणी करीत आहेत. न्यायालयाने पेन्शनवाढीचा निर्णय दिला आहे. तरी आयुष्मान भारत प्रमाणे पेन्शनवाढ जाहीर व्हावी.

**- विजय कदम, लोअर परळ**

### कमळाला इंजिनाचा आधार?

जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणवणाऱ्या भाजपला आता मनसेची गरज वाटू लागली आहे. पूर्वी सुपारीबाज पक्ष म्हणून हिणवणारे भाजपचे चाणक्य, अलीकडे मनसेचे भलतेच कौतुक करताना दिसतात. 'पार्टी विथ डिफरन्स' म्हणजे काय, हे आता राज्यातील जनतेला चांगलेच कळून चुकले आहे. बहुदा शिवसेना व राष्ट्रवादीची निवडणुकीत पीछेहाट होण्याची शक्यता लक्षात घेऊनच रेल्वे इंजिन जोडण्याचा डाव असावा. त्यामुळे दोन प्रादेशिक पक्षांची वाट लावल्यानंतर आता दुसऱ्या ठाकरेंना संपवण्याची सुपारी तर घेतली नाही ना ? परंतु जनता त्यांना कसा प्रतिसाद देते यावरच पुढील भवितव्य अवलंबून आहे. यातून एक स्पष्ट झाले की, स्वबळावर भाजपला सत्ता मिळणार नाही. कारण त्यांच्या केंद्रीय नेत्यांची लोकप्रियता दिवसेंदिवस घटत असल्याचे वास्तव समोर आहे. जनतेला धार्मिक ध्रुवीकरणात अजिबात रस नसून, ते जसे बोलतात तसे वागत नाहीत. महिलांवरील वाढत्या अत्याचारातून हे प्रकर्षाने दिसून येते. केवळ पैसे वाटून महिलांचे सबलीकरण होणार नसून त्यांची सुरक्षाही तितकीच महत्त्वाची आहे. त्यातच हिंदुत्वाचे कार्ड आता चालणार नसल्याने इंजिन जोडण्याचा साक्षात्कार झाला असावा. या पक्षाची आजवरची वाटचाल पाहता, प्रत्येक राज्यात कोणाची तरी मदत घेऊन त्यालाच संपवायचे, ही राजनीती आता देशातील जनतेला कळून चुकली आहे. संविधानाची मोडतोड करून सत्तेचा उपभोग घ्यायचा हेच यांचे मतलबी राजकारण ! म्हणूनच राजकारणात यांना कोणीच आपले व परके नाहीत. फक्त सोयीचे राजकारण करायचे. अर्थात त्यासाठी कोणाच्याही कुबड्या घ्यायची यांची तयारी असते हे विशेष ! प्रसंगी खोट्याचा आधार घ्यायचा ही खुबी त्यांना चांगलीच अवगत आहे. म्हणूनच यार्डात गेलेल्या इंजिनाला आर्थिक बळ दिले असावे अशी शंका येते. अलीकडे शिंदे सेनेवर टीका होते, यावरून सेना - राष्ट्रवादीला बाहेरचा रस्ता दाखवण्याचा डाव दिसून येतो. कारण दोन्ही पक्षांनी चिन्ह ढापल्याचा आरोप केल्याने त्याला पुष्टी मिळते. त्यामुळे भाजप - मनसे जवळीक वाढल्याने भाजपला आता दुसऱ्या ठाकरेंच्या कुबड्या घ्याव्या लागणार हे सिद्ध होते. अर्थात नजीकच्या काळात मुंबई पालिकेच्या निवडणुकीची ही पूर्वतयारी असावी असे वाटते. त्यामुळे कमळाबाईला आधार इंजिनाचा !

**- पांडुरंग भाबल,भांडुप.**

### बारामतीत शरद पवार कोणता नवा डाव खेळणारं ?

१५ वी. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अनेक अर्थानी महत्वाची ठरणार आहे. प्रामुख्याने महायुती अंतर्गत शिंदे शिवसेना, भाजपा, अजितदादांची राष्ट्रवादी विरुद्ध महाविकास आघाडीमधील काँग्रेस, उद्धव ठाकरे शिवसेना, शरद पवार राष्ट्रवादी यांच्यामध्येचं खरी लढत होणार आहे. विशेष करुन अवघ्या देशाचे लक्ष लागून राहिले आहे ते बारामती विधानसभेच्या निवडणुकीतील लढतीकडे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि बारामती तालुका कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष युगेंद्र पवार यांच्या हायहोल्टेज, काटे की टक्कर होणाऱ्या निवडणुकीकडे खऱ्या अर्थाने सख्या काका - पुतण्यात बाजी कोण मारणारं ? या प्रश्नाचे उत्तर मात्र २३ नोव्हेंबरलाचं मिळणारं आहे. युगेंद्र पवार पहिली निवडणूक लढवत असले तरी राजकारणातील मास्टरमाईंड असलेले आजोबा अर्थात शरद पवार यांची ताकत त्यांच्या मागे उभी आहे पक्षात बंडखोरी करुन भाजपसोबत सत्तेत गेलेल्या अजित पवारांसाठी सन्मानाची आणि अस्तित्वाचीही लढाई ठरणारं आहे.घराण्यातील लढाईमुळे शरद पवारांचा कसं लागणारं आहे पहिल्यांदा लोकसभेची निवडणूक आणि आता विधानसभेची. यामध्ये पवार विरुद्ध पवार लढत होवून अखेर कोणी का असेना शेवटी पवार कुटुंबातील सदस्यच निवडून येणार आहे त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात बरीच वर्षे सत्तेच्या सारीपाटात पवार पॅटर्न केंद्रस्थांनी राहिला आहे हे नजरेआड करता येणारं नाही. अजितदादांचा स्वभाव जरा फटकळ असला तरी प्रशासनावर त्यांची नेहमीच मजबूत पकड असल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. त्यांच्याकडे फुटून गेलेले अनेक मातब्बर नेत्यांची टीम कार्यरत असून दादांच्या मागे त्यांचा दांडगा राजकीय अनुभव आहे. याउलट राजकारणातील मास्टरमाईंड, वस्ताद अशी बिरुदावली लावली जाते ते शरद पवार यावेळी नवा कोणता डाव टाकतात तसेच युगेंद्र पवार कुस्तीच्या आखाड्यातील अनुभवाचा वापर राजकारणात करुन यशस्वी होतात का हे पहाणे देखील महत्वाचे आहे. २८८ जागेसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी अजून रंग चढणार असला तरी प्रत्येकाला अस्तित्वासाठी झगडावे लागणार असून कोणाचे पानिपत होणार आणि कोण विजयाची मोहर उमटविणार ते पाहणे मोठे रंजक ठरणारं आहे.

**- राजू जाधव, बेळगांव**

## कल्याणमध्ये दिवाळी पहाटच्या माध्यमातून मतदान जनजागृती

**डोंबिवली:** कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघातील विजयनगर परिसरातल्या अजिंक्य प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या दिवाळी पहाट या संगीतमय कार्यक्रमाच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली. मतदान जनजागृतीसाठी स्वीप कार्यक्रमांची अंमलबजावणी ठिकठिकाणी करण्यात येत आहे. या अनुषंगाने कल्याण पूर्वचे निवडणूक निर्णय अधिकारी रमेश मिसाळ आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वाती घोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरूवारी स्वीप अर्थात मतदार जनजागृती पथकातील महापालिकेचे शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी विजय सरकटे यांच्या अधिपत्याखाली हा लक्षवेधी कार्यक्रम हाती घेतला होता.



### म ह त्त्वा चे

#### रिक्षाच्या धडकेत हवालदार जखमी

**डोंबिवली :**रामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या दोन घटनांमध्ये दोघा रिक्षावाल्यांवर पोलिसांनी दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एका घटनेत मद्यपान केलेल्या एका रिक्षावाल्याने पोलिस हवालदाराला पाठीमागून जोरात धडक देऊन त्याला जखमी केले. तर दुसऱ्या प्रकरणात एक रिक्षावाला डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळ वाहतूक कार्यालयासमोर रस्त्याच्या मध्यभागी रिक्षा उभी करून वाहतुकीला अडथळा आणत होता. या दोन्ही दारूड्यांवर फौजदारी कारवाई करण्यात आली आहे.रामनगर पोलिस ठाण्याचे हवालदार रवी व्हनवटे सोमवारी आपल्या सहकाऱ्यांसह गस्त घालत होते. इतक्यात रेल्वे स्थानकाजवळील वाहतूक नियंत्रण शाखेच्या कार्यालयासमोर आल्यावर त्यांना एक रिक्षावाला रस्त्याच्या मध्यभागी रिक्षा उभी करून इतर वाहनांना अडथळा होईल आणि इतर वाहन चालकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत थांबला होता. त्याचे नाव दिलीप गोरबंजारा (32, रा. द्वारलीपाडा, कल्याण-पूर्व) असे असून त्याला हवालदार व्हनवटे यांनी समज दिली. पोलिस ठाण्यात नेऊन त्याच्यावर सार्वजनिक ठिकाणच्या वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशी कृती केली म्हणून गुन्हा दाखल केला.

#### खारघर पोलिसांनी नायजेरियन नागरिकांचा ड्रग्स पार्टीचा बेत उधळला

**पनवेल** : नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने सोमवार 28 ऑक्टोबर रोजी पहाटे खारघरमध्ये 2 रो-हाऊसवर छापे मारुन ड्रग्स तसेच दारूपार्टीसाठी जमलेल्या 20 नायजेरीयन नागरिकांची धरपकड केली आहे. यात 13 पुरुष आणि 7 महिलांचा समावेश आहे. खारघर सेक्टर-7 मधील लेमन किचन व जेमिनी किचन या 2 नाजयेरीयन किचनमध्ये ड्रग्स तसेच दारुच्या पाटर्या सुरु असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेतील 150 जणांचे पोलीस पथक, दंगल नियंत्रण पथक व फॉरेन्सिक टिमने छापा टाकला. यावेळी 20 नायजेरीयन पुरुष व महिला हे पार्टी करीत असताना आढळून आले. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यावेळी अमली पदार्थ विरोधी पथकाने केलेल्या झडतीत तब्बल 26 लाख 77 हजार 500 रुपये किंमतीचे 107 ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन व 22,490 रुपये किंमतीचा मद्यसाठा आढळुन आला असून पोलिसांनी अमली पदार्थ व मद्याचा साठा जप्त केला आहे.

#### माथेरानच्या राणीचा 1 नोव्हेंबरचाही मुहूर्त हुकला

**कर्जत** : पावसाळ्यात विश्रांतीला गेलेली माथेरानची राणी म्हणजेच मिनी ट्रेन साधारण दसऱ्याला सुरु होते. मात्र, यंदा राणीला उशीर झाला आहे. दसऱ्यानंतर दिवाळीचा मुहूर्तदेखील माथेरानच्या महाराणीने हुकवला आहे. नेरळ-माथेरान मार्गावरची काही कामे अजून पूर्ण झाली नसल्याने मिनी ट्रेन सुरू होण्यास उशीर झाला असल्याची माहिती समोर येत आहे.

# मी टोल माफीचा मास्टर स्ट्रोक दिला, श्रेय कुणालाही घेवू द्या

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा टोला



प्रतिनिधी
■ ठाणे

मी टोल माफ करून टाकला, लेक लाडकी केली, ३ मोफत सिलेंडरचा गोरगरीबांना फायदा होतो आहे. मी आमदार असतांना टोल माफीसाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती, तेव्हा माझ्याकडे अधिकार नव्हते. पण अधिकार आल्यावर टोल माफी करायची मी ठरवले होते, त्यामुळे मी टोलमाफीचा मास्टर स्ट्रोक दिला, त्याचे श्रेय कुणालाही घेवू द्या, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला. राज्यात आमच्या सरकारने केलेल्या कामाची पोचपावती दिल्याशिवाय जनता राहणार नाही, पुढचे सरकार महायुतीचेच असेल आणि ते पारदर्शी कारभार करेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

येथील रहेजा गृहसंकुलात दिवाळी पहाट कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट देवून रहिवाशांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी खासदार नरेश म्हस्के, माजी नगरसेवक विकास रेपाळे, नम्रता भोसले, रहेजा संकुलातील प्रसिध्द खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण संकुलाचे पदाधिकारी उपस्थितीत होते. मंत्री म्हणून मी विविध खात्यांचा कारभार सांभाळला, प्रत्येक विभागाला न्याय देण्याचा प्रयत्न मी केला, पण हातात दोन - सव्वा दोन वर्षेच होती. या दोन सव्वा वर्षात राज्यातले रखडलेले, अडकलेले प्रकल्प आमच्या सरकारने सुरू केले. अटल सेतू, कोस्टल, ठाण्यातील मेट्रो, रिंगरोड सारखे प्रकल्प आम्ही सुरू केले. विकास आणि कल्याणकारी योजनांची सांगड घालण्याचा प्रयत्न आमच्या सरकारने केला. मोठ्या प्रमाणावर उद्योग महाराष्ट्रात आणून रोजगार आणण्याचा प्रयत्न आम्ही केला. कमी कालावधीत जास्त कामे करण्याचे भाग्य मला लाभल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.

यावेळी प्रसिध्द गायिका मृदूला दाढे जोशी व गायक निलेश निरगुडकर यांची गायनाची मैफल झाली. या मैफलीत जुनी अवीट गोडींची गाणी व्दयींनी सादर केली. दिगंबर माने, पंकज बनसोडे, ऋषीराज साळवी, दिगंबर मानकर आशुतोष दांडगे उदय मटकर यांनी मैफलीला स्वरसाज चढवला.

# अखिल आगरी समाज परिषद आ. बालदी यांच्याविरोधात आक्रमक



## आमदारांना समाजविरोधी वक्तव्य भोवणार...

प्रतिनिधी
■ पनवेल

उरण मतदारसंघातील भाजपचे उमेदवार महेश बालदी त्यांनी अलीकडेच केलेल्या दोन वक्तव्यावरून ते टिकेचे धनी ठरले आहेत. यावरून अखिल आगरी समाज परिषद आक्रमक झाली असून महेश बालदी यांनी आगरी समाजाची माफी मागण्याची मागणी केली आहे. महेश बालदी यांनी एका जाहीर सभेत मी अखिल भारतीय आगरी समाज परिषदेच्या निवडणुकीला उभा नसून, विधानसभेच्या निवडणुकीला उभा आहे, असे वक्तव्य केले होते. त्यावरून हे वक्तव्य म्हणजे आगरी समाजाला कमी लेखण्याचा प्रयत्न आहे, असे नमूद करून त्यांचा निषेध करून बालदी यांनी आगरी समाजाची जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

अखिल आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष दशरथ का. पाटील, कार्याध्यक्ष जे. डी. तांडेल, सरचिटणीस दीपक म्हात्रे यांनी बालदी यांना पत्र लिहून माफी मागण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आता महेश बालदी माफी मागणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अखिल आगरी समाज परिषद ही सामाजिक संस्था आहे. या परिषदेसाठी कॉ. जी. एल. पाटील, ग. ल. पाटील, वाजेकर शेठ, सोनूभाऊ बसवंत, ॲड. दत्ता पाटील, प्रभाकर पाटील तसेच दि. बा. पाटील यांनी फार मोठे योगदान आहे. दिबांनी १९८८ ते २०१३ पर्यंत या परिषदेचे समर्थ नेतृत्व केले आहे. म्हणूनच त्यांचे नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्याचा ठराव विधिमंडळाने मंजूर केला आहे. यासाठी अखिल आगरी समाज परिषदेच्या माध्यमातून मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, पुणे आदी जिल्ह्यांतील प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्रांनी सर्वपक्षीय लढा दिला होता.

लवकरच नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव दिले जाईल, असे आश्वासन केंद्रीय नागरी हवाई वाहतुक मंत्री श्री. नायडू यांनी सर्व पक्षीय कृती समितीला दिले आहे. असे असताना महेश बालदी यांनी एका जाहीर सभेत अदानी विमानतळाशी चर्चा केल्याचे सांगितले. त्यांचे हेही वक्तव्य चुकीचे असून दि. बा. पाटील यांच्या नावाला विरोध करणारे असल्याचा समज आगरी समाजात पसरला आहे. महेश बालदी यांच्या या वक्तव्यामुळे भूमीपुत्रांच्या अस्मितेला धक्का पोहचला आहे. वरील दोन्ही वक्तव्यासंबंधी महेश बालदी यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी अखिल आगरी समाज परिषदेने केली आहे.

## खारघर पोलिसांनी नायजेरियन नागरिकांचा ड्रग्स पार्टीचा बेत उधळला

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने सोमवार 28 ऑक्टोबर रोजी पहाटे खारघरमध्ये 2 रो-हाऊसवर छापे मारुन ड्रग्स तसेच दारूपार्टीसाठी जमलेल्या 20 नायजेरीयन नागरिकांची धरपकड केली आहे. यात 13 पुरुष आणि 7 महिलांचा समावेश आहे. खारघर सेक्टर-7 मधील लेमन किचन व जेमिनी किचन या 2 नाजयेरीयन किचनमध्ये ड्रग्स तसेच दारुच्या पाटर्या सुरु असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेतील 150 जणांचे पोलीस पथक, दंगल नियंत्रण पथक व फॉरेन्सिक टिमने छापा टाकला. यावेळी 20 नायजेरीयन पुरुष व महिला हे पार्टी करीत असताना आढळून आले. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यावेळी अमली पदार्थ विरोधी पथकाने केलेल्या झडतीत तब्बल 26 लाख 77 हजार 500 रुपये किंमतीचे 107 ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन व 22,490 रुपये किंमतीचा मद्यसाठा आढळुन आला असून पोलिसांनी अमली पदार्थ व मद्याचा साठा जप्त केला आहे.

या कारवाईत पकडण्यात आलेल्यापैकी 13 नायजेरीयन नागरीकांनी कोणताही भाडे करार न करता तसेच सी फॉर्म न भरता खारघरमध्ये लेमन किचन व जेमिनी किचन चालवत असल्याचे तपासात आढळुन आले आहे. त्यामुळे पोलिसांनी या 13 नायजेरीयन नागरीकांविरोधात परदेशी नागरिक कायदा व रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## दिल्लीतील पत्रकाराला राष्ट्रवादीचे उमेदवार नजीब मुल्लांच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण

### मुंब्रा पोलिसांत गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ ठाणे

विधानसभा निवडणुकीनिमित्त वार्तांकनासाठी मुंबईत आलेल्या दिल्लीतील पत्रकाराला अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार नजीब मुल्ला यांच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात मुल्ला यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या पत्रकाराला शिवीगाळ करत त्याच्या कॅमेरामनच्या हातून कॅमेरा हिसकावून घेण्याचा खळबळजनक प्रकार मुंब्र्यात घडला आहे. याप्रकाराचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

राजधानी दिल्लीतील पत्रकार औरंगजेब चौधरी हे युट्यूबसाठी काम करतात. विधानसभा निवडणूक कव्हर करत असताना त्यांनी मुंब्र्यातील काही लोकांशी संवाद साधताना त्यांना काही अडचणीची प्रश्न विचारले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार नजीब मुल्लांच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केली आहे. याप्रकरणी पत्रकार औरंगजेब चौधरी यांनी मुंब्रा पोलीस ठाण्यात मुल्ला यांच्याविरोधात तक्रार दिली असून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे..

व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये पत्रकार औरंगजेब चौधरी हे प्रश्न विचारत असताना त्यांना सुरुवातीला नजीब मुल्ला यांच्या कार्यकर्त्यांनी रोखलं आणि तुम्ही पैसे घेऊन बातमीदारी करता असा आरोप केला. त्यानंतर पत्रकार औरंगजेब यांनी कार्यकर्त्यांना विचारलं की पैसे घेतल्याचे पुरावे दाखवा, त्यानंतर तो कार्यकर्ता निरुत्तर झाला. त्यावर दुसरा एक कार्यकर्ता चिडला आणि तुम्ही गोदी मिडिया आहात अशा शब्दांत डिवचण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पत्रकार औरंगजेब यांनी तुमची बाजू मी मांडतो तुम्ही बोला. त्यावर तिसरा एक कार्यकर्ता आला आणि त्यानं पत्रकाराला मारहाण केली आणि त्याचा कॅमेरा हिसकावून घेऊन बंद पाडण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, माध्यमांवर अशा पद्धतीनं गुंडगिरी करुन मारहाण आणि शिविगाळ करुन दबाव आणण्याचा आणि आवाज दाबवण्याचा प्रयत्न केल्यानं पत्रकार औरंगजेब चौधरी यांनी मुंब्रा पोलिसांत धाव घेत नजीब मुल्ला यांच्याविरोधात तक्रार दिली, त्यानंतर मुल्ला यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला.

पान ९ वरुन

#### अरविंद सावंतांना 'माल' प्रकरण भोवलं

तुम्ही सर्व जाणता की, मी किती निष्ठेने काम केले आहे. मुंबादेवीचे आशीर्वाद आहेत. मी महिला आहे पण माल नाही. आमच्यासारखी प्रोफेशनल महिला, सक्षम महिला किंवा कोणतीही महिला, त्यांच्याप्रती तुम्ही अभद्र टीका करणार असाल, तर ही एफआयर आणि कायदा आपले काम करेल. जेव्हा एखाद्या महिलेबद्दल तुम्ही अभद्र वक्तव्य करतात, तेव्हा तुम्ही तिचा अवमान करतात. तुम्हाला वाटते प्रत्येक महिला शांत राहणार. पण ही महाराष्ट्राची महिला उत्तर देणार, असे प्रत्युत्तर शायना एन. सी. यांनी अरविंद सावंत यांना दिले. खासदार अरविंद सावंत यांना उमेदवारांवरून एक प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी मुळचे आणि बाहेरून आलेल्यांसंदर्भात वक्तव्य केले. त्यामध्ये त्यांनी शायना एन सी यांच्या बाबत 'इम्पोर्डेट माल' असे वक्तव्य केले होते. त्यानंतर हे प्रकरण शिवसेनेच्या नेत्या आणि कार्यकर्त्यांनी उचलले. शायना एन सी यांना इम्पोर्टेड माल असे संबोधल्याने हे प्रकरण चिघळले. शायना यांनीही या वक्तव्याची दखल घेत नागपाडा पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली आहे.

#### सेन्सेक्स 634 अंकांनी वाढला

वाढ झाली आहे. भारतीय शेअर बाजाराच्या इतिहासात, गुंतवणूकदारांनी संवत 2080 मध्ये सर्वाधिक कमाई केली आहे. नॅशनल स्टॉक एक्सचेंजमध्ये मुहूर्तावर विशेष पूजेचे आयोजन करण्यात आले आहे. एनएसईचे एमडी आणि सीईओ आशिष चौहान यांनी गुंतवणूकदारांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि सांगितले की नवीन संवत 2081 हे मागील संवत 2080 पेक्षा अधिक चांगले असावे. गुंतवणूकदारांना पैसा तुमचा आहे आणि तो अधिक चांगल्या पद्धतीने गुंतवा, असा सल्ला देताना त्यांनी टिप्स, अफवा, व्हॉट्सॲप मेसेजकडे लक्ष देऊ नका, असे आवाहन केले आहे. तसेच, ज्या गुंतवणूकदारांना डेरिव्हेटिव्ह्जचे ज्ञान नाही त्यांनी त्यामध्ये व्यापार न करण्याचा सल्ला दिला आहे. बाजार उघडला तेव्हा निफ्टी-50 मध्ये महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, एनटीपीसी, बीईएल आणि आयशर मोटर्सच्या शेअर्समध्ये वाढ दिसून आली. सुरुवातीच्या टप्प्यात हे शेअर बाजारात सर्वाधिक तेजीत होते. अदानी ग्रुपच्या शेअर्सचा विचार करता, अदानी एंटरप्रायझेसच्या शेअर्समध्ये विक्री दिसून आली, तर समूहाच्या अदानी पॉवर आणि अदानी एनर्जीच्या शेअर्समध्ये वाढीसह व्यवहार होताना दिसला.

#### फोन टॅप होतायत...

नवनिर्माण सेनेचे आणि भाजपचे धोरण असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. म्हणजेच महाराष्ट्राच्या विरोधामध्ये जे पक्ष असतील त्यांना मदत करणे, हे त्यांचे राष्ट्रीय धोरण असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. बोगस आधार कार्डच्या माध्यमातून हजारो बोगस नावे मतदार यादीमध्ये घुसवली जात आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून हे भाजपचे सुरू असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. हा भाजप आणि त्यांचा आयटीसेलचा एक उपक्रम असतो. मात्र हे अत्यंत गंभीर आहे. याबाबत आम्ही वारंवार तक्रारी केल्याचेही राऊत यांनी म्हटले आहे.

#### मनसेबरोबर काही जागांवर युती

होऊ शकतात. त्यासाठी फडणवीस यांनी शिवडी सारख्या जागेचे उदाहरण देखील दिले. माहीम विधानसभा मतदारसंघात राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे हे निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यांच्या विरोधात एकनाथ शिंदे यांचे सदा सरवणकर हे विद्यमान आमदार रिंगणात आहेत. तर उद्धव ठाकरे यांनी देखील इथे उमेदवार दिला आहे. त्यामुळे या मतदारसंघात तिरंगी लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यात सदा सरवणकर यांनी माघार घेतल्यास अमित ठाकरे यांचा मार्ग सुकर होऊ शकतो. त्यामुळे या घटना घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

## मीरा-भाईंदरच्या 3 माजी नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश

### विविध पक्षाचे शेकडो कार्यकर्ते , पदाधिकारी शिवसेनेत दाखल

प्रतिनिधी
■ भाईंदर

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असून ओवळा माजीवडा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रताप सरनाईक यांच्या विकासकामांच्या धडाक्याने प्रेरित होऊन , मोठ्या प्रमाणात शिवसेनेत इनकमिंग सुरू आहे. आतापर्यंत मीरा भाईंदरच्या तीन माजी नगरसेवकांनी आमदार प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. तर उबाठा गटाचे , काँग्रेस व इतर अनेक पक्षाचे पदाधिकारी , शेकडो कायकर्ते यांनी गेल्या १० दिवसात शिवसेनेत प्रवेश केला असून त्यामुळे ओवळा माजीवडा मिरा भाईंदर विधानसभेत शिवसेना आणखी मजबूत झाली आहे. शिवसेना भाजप राष्ट्रवादी आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रताप सरनाईक यांनी आपल्या आजवरच्या कारकिर्दीत विकासकार्याचा डोंगर मतदारसंघात उभा केला आहे. त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन दररोज पक्ष प्रवेश होत आहेत.



मीरा भाईंदर येथील काँग्रेस पक्षाच्या माजी नगरसेविका सौ. सुनिता पाटील व त्यांचे पती श्री. कैलास पाटील यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसमवेत शिवसेना पक्षाचे मुख्यनेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच शिवसेना पक्षात प्रवेश केला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा सेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक , खासदार नरेश म्हस्के उपस्थित होते. भाईंदर पूर्वेकडील उबाठा गटातील माजी नगरसेवक जयंतीलाल पाटील यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह आमदार प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्षात मिरा भाईंदर येथे जाहीर प्रवेश केला. भाईंदर पूर्वेचे माजी नगरसेवक अरविंद ठाकूर यांनीही आमदार सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्षात मिरा भाईंदर येथे प्रवेश केला.

हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन, मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या विश्वासाने आणि आमदार सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाण्यातील चिरागनगरचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक सुरेश दाजी भोईर यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

त्याचबरोबर काल रात्रीही मोठा पक्षप्रवेश पार पडला. मिरा भाईंदर येथील उबाटा आणि राष्ट्रवादी पक्षाच्या अनेक मुख्य पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांचे स्वागत करुन पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सामान्य माणसांच्या हक्कासाठी, आपण हे पाऊल उचलले आपल्या या निर्णयावर व माझ्यावर असलेला विश्वास दाखवून पक्षप्रवेश करण्यात आला. दिवसेंदिवस आपल्या शिवसेना पक्षाची ताकद अजून बळकट होत आहे, याचा मला आनंद आहे असे आमदार सरनाईक म्हणाले. या पक्षप्रवेशवेळी शिवसेना पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते व्यासपीठावर उपस्थित होते.

## सुप्रसिद्ध गायिका प्रियंका बर्वे आणि आनंद गंधर्व आनंद भाटे यांच्या सुश्राव्य गाण्यांने पनवेलकर मंत्रमुग्ध

### महापालिकेच्या दिवाळी पहाट कार्यक्रमांस पनवेलकरांचा उदंड प्रतिसाद

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आज शुक्रवार दिनांक १ नोव्हेंबर रोजी पहाटे वडाळा तलाव परिसरात आयोजित केलेल्या 'दिवाळी पहाट' कार्यक्रमध्ये आनंद गंधर्व पंडीत आनंद भाटे आणि सुप्रसिद्ध गायिका प्रियांका बर्वे सुश्राव्य गाण्यांने रसिक पनवेलकर मंत्रमुग्ध झाले. महापालिकेने परंपरा जपत मतदान जनजागृतीसाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमास पनवेलकरांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

यावेळी महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. मंगेश चितळे,निवडणूक निर्णय अधिकारी श्री.पवन चांडक , अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहायक आयुक्त श्रीराम पवार, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, महापालिका अधिकारी, कर्मचारी व हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



गेल्या काही वर्षांपासून महानगरपालिकेच्यावतीने पनवेलकरांची दिवाळी सुरमयी व्हावी यासाठी दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करते आहे. यावर्षी विधानसभा निवडणुक 2024 निमित्ताने या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वीप कार्यक्रमांत मतदान जनजागृती यावेळी करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी श्री.पवन चांडक यांनी नागरिकांना 'मतदान शपथ' दिली.

तसेच महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री. मंगेश चितळे यांनी नागरिकांनी येत्या २० नोव्हेंबरला मतदानाच्या हक्काची अमंलबजावणी करण्यासाठी, सुजाण लोकप्रतिनिधी निवडून आणण्यासाठी नागरिकांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन उपस्थितांना केले. तसेच उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

दरम्यान कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयुक्तांनी आनंद गंधर्व पंडीत आनंद भाटे आणि पार्श्वगायिका गायिका प्रियांका बर्वे , निवेदिका दिप्ती भागवत यांचा स्मृती चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. उपायुक्त डॉ वैभव विधाते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी गेल्या आठवड्यापासून उपायुक्त कैलास गावडे व शहर अभियंता संजय कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली.

यावेळी गायिका प्रियांका बर्वे यांनी कवी सुरेश भट यांची गजल केव्हा तरी पहाटे गाण्याने रसिकांना मंत्रमुग्ध केले. लोकसंगीत सादर करताना जाळी मंदी पिकली करवंद ही लावणी सादर केली. तसेच अभंग अवचिता परिमळू, नाट्य संगीतामध्ये नाही मी बोलत हे नाट्यपद सादर केले. गायक आनंद भाटे यांनी संगीत सौभद्र नाटकामधील राधा धर मधू मिलिंद जय जय ,रम्य ही स्वर्गाहून लंका, संगीत मानापमानमधील युवती मना दारूण रण अशी अनेक नाट्यपदे सादर करून रसिक श्रोत्यांची मने जिंकली. याचबरोबर लक्ष्मी बारम्मा, बाजे मुरली या बाजे, बोलावा विठ्ठल, माझे माहेर पंढरी, अवघा रंग झाला, चिन्मया सकल ऱ्हदया अशी सुंदर भजने सादर केली.

#### डोंबिवलीतील माणकोली पुलावर दिवाळीचा आखाडा

**डोंबिवली** : डोंबिवली शहर परिसरातील बहुतांशी तरूण दिवाळी सणाचा आनंद साजरा करण्यासाठी मोठागाव येथील माणकोली पुलावर दररोज रात्रीच्या वेळेत गटाने येऊन फटाके फोडत आहेत. अनेक तरूण पुलाच्या कठड्यावर उभे राहून फटाके पेटवून उंच किंवा उल्हास नदी पात्राच्या दिशेने फेकत आहेत. रात्रीच्या वेळेत या रस्त्यावरून वाहनांची वर्दळ असते. एखादा फटाका वाहनात घुसून काही दुर्घटना होण्याची भीती काही प्रवासी व्यक्त करत आहेत.


पश्चिम रेल्वे
ऑक्यूपन्सी सेन्सर-बेस्ड कंट्रोलर्सची तरतूद
वरी. डीईई/पी/बीसीटी ई-निविदा सूचना क्र: ईएल-४-३१४-डब्ल्यूए-६ (आर-१) दिनांकित: २८-१०-२०२४. काम आणि ठिकाण: एअर कंडीशनर युनिटसकरीता ऑक्यूपन्सी सेन्सर-बेस्ड कंट्रोलर्सची तरतूदीद्वारे ऊर्जा संवर्धन. कामाचे अंदाजे मूल्य: रु. १,१८,७०,८२६.००/-. बोली सुरक्षा ठेव मूल्य: रु. २,०९,४००/- सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ : २९.११.२०२४ रोजी १५:०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २९.११.२०२४ रोजी १५:३० वा. अधिक तपशिलासाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. ०६९९
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

**मुंबई :** भायखळा विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार शमीम अंसारी यांना हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख सर्व धर्मीयांचा वाढता जाहीर पाठिंबा मिळत आहे. शमीम अन्सारी यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाल्यावर अनेक नागरिकांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. विभागातील सर्व नागरिक शमीम अन्सारी यांना निवडून येण्यासाठी शुभेच्छा देत आहेत. तसेच अबकी बार अपक्ष उमेदवार असे भायखळा येथील स्थानिक नागरिक म्हणत आहेत.



# बंडखोरांची समजूत घालण्यात यशस्वी होऊ!

## फडणवीस यांचा विश्वास

प्रतिनिधी
■ नागपूर

यावेळी विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली असली तरी बंडखोरांची समजूत घालण्यात आम्ही नक्कीच यशस्वी होऊ असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला. महायुतीतील बंडखोरी रोखणेच्या दृष्टीने कालपासून भाजप शिवसेनेत डॅमेज कंट्रोलवर भर दिला जात आहे आज नागपूर तेही फडणवीस- बावनकुळे यांनी अनेक बंडखोरांशी समजूत घातली.

भाजपच्या विभागीय कार्यालयात दिवाळीनिमित्त स्नेह मिलन कार्यक्रमानंतर ते बोलत होते. या संदर्भात बोलताना फडणवीस म्हणाले, शेवटी ते आमचेच लोक आहेत. त्यामुळे त्यांना समजावून सांगने आवश्यक आहे. अनेक वेळा रोष मोठा असतो. अशावेळी पक्षाचे व्यापक हित लक्षात घेता चर्चा सुरू आहे. सर्व लोकांनी सकारात्मक



मानसिकता दर्शविली आहे. नक्कीच मला विश्वास आहे की आम्ही सर्वांनाच समजविण्यात यशस्वी होऊ असेही ते म्हणाले. आपल्या सुरक्षेत वाढ झाल्या संदर्भात बोलताना त्यासंबंधी पोलिसांना माहिती आहे असे उत्तर दिले. आमचा प्रघात राहिला आहे की दिवाळीच्या दिवशी विभागीय कार्यालयामध्ये येतो. बरीच वर्षे आम्ही सर्व डबे घेऊन येतो आणि खातो.यात काही काळासाठी खंड पडला होता, पण मला आनंद आहे एकदा पुन्हा लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने आज पुन्हा सगळ्यांच्या भेटी झाल्या. कार्यकर्ते, जुने सहकारी यांच्या भेटी घेतल्या, गप्पा मारल्या, त्यामुळे दिवाळी अतिशय आनंदाची आहे.

भारतीय जनता पक्ष हा संघटनेच्या आधारावर चालणारा पक्ष आहे. कार्यकर्त्यांच्या आधारावर चालणारा पक्ष आहे. या पक्षाची जी ऊर्जा आहे ती कार्यकर्त्यांच्या माध्यमातून येते, तेच आम्हाला विजयाकडे घेऊन जातात यावर भर दिला. या दिवाळी स्नेह मिलन कार्यक्रमाला विदर्भ संघटक डॉ उपेंद्र कोठेकर, आमदार प्रवीण दटके, माजी आमदार गिरीश व्यास व इतर मान्यवर उपस्थित होते.

# भाजपने अजित पवारांना पूर्ण ब्लॅकमेल केलं

## जयंत पाटील यांचा आरोप

प्रतिनिधी
■ सांगली

भाजपने अजित पवारांवर 70 हजार कोटी रुपयांचा सिंचन घोटाळयाचा आरोप केला आणि त्यांना ब्लॅकमेल केलं असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी केला आहे. तसेच राष्ट्रवादीत फूट पाडण्यासाठीच भाजपने या आरोपांचा वापर केला असेही पाटील म्हणाले.

एका खासगी दैनिकाला जयंत पाटील यांनी मुलाखत दिली. तेव्हा पाटील म्हणाले की, देवेंद्र फडणवीस जेव्हा विरोधात होते तेव्हा त्यांनी अजित पवारांवर सिंचन घोटाळयाचे आरोप केले.



फडणवीस जेव्हा सत्तेत आले तेव्हा त्यांनी आर आर पाटील यांच्यावर आरोप करून अजित पवार यांना फाईल दाखवली. याचा अर्थ या आरोपांचा वापर आमचा पक्ष फोडण्यासाठी केला गेला. त्यानंतर या फाईल्स दाखवून अजित पवारांना 10 वर्ष ब्लॅकमेल केलं. म्हणून अजित पवार भाजपसोबत गेले असं दिसतंय.

त्यामुळेच अजित पवारांनी स्वतःला महायुतीतून दूर केले असे जयंत पाटील म्हणाले. पण अजित पवारांनी आर आर पाटील यांच्याबद्दल केलेल्या विधानामुळे देवेंद्र फडणवीस अडचणीत आले आहेत. या विधानामुळे भाजप एक्सपोज झाली आहे. तसेच गेल्या 10 वर्षात फडणवीस आणि अजित पवार यांचे संबंध कसे आहेत हे ही समोर आले आहेत असेही पाटील म्हणाले.

## जरांगेंचे मराठा उमेदवारांना निर्देश

# आपआपसात चर्चा करुन एकाचे नाव निश्चित करा

## 3 तारखेला अंतीम निर्णय जाहीर करणार

प्रतिनिधी
■ जालना

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा, मुस्लिम आणि दलित समीकरण एकत्र करून निवडणुकीला सामोरे जाण्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मात्र यातच एकाच मतदारसंघात मराठा आंदोलनाच्या माध्यमातून अनेक उमेदवार रिंगणात उतरले आहेत. या उमेदवारांनी अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यातील एकाच उमेदवाराला एका मतदारसंघात मनोज जरांगे पाटील पाठिंबा देणार आहेत. तोच पक्षाचा अंतिम उमेदवार असेल. मात्र याबाबत निर्णय घेण्यासाठी सर्व इच्छुकांनी आपसात चर्चा करून



एक नाव अंतिम करण्याचा सल्ला मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे मुस्लिम धर्मगुरू आणि दलित समाजातील ज्येष्ठ नेत्यांची एकत्रित बैठक बोलावली होती. या बैठकीत मुस्लिम, मराठा आणि दलित यांनी एकत्र निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्णय घेतला. यात जे मतदारसंघांमध्ये राखीव आहेत त्या मतदारसंघात दलित समाजाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला जाणार आहे. तर इतर ठिकाणी मराठा समाजाचे उमेदवार असतील. यासोबतच इतर छोट्या मोठ्या सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र घेणार असल्याचे मनोज जरांगे यांनी जाहीर केले आहे. त्यातच आता एका मतदारसंघात अनेक इच्छुक उमेदवार आपण मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने निवडणुकीला सामोरे जात असल्याचा दावा करत आहेत. या सर्व उमेदवारांनी एकत्र चर्चा करून एका जण अंतिम करण्याचे आवाहन मनोज जरांगे यांनी केले आहे.

या संदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले की, विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या आणि उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या मराठा बांधवांनी तातडीने एकत्र बसून बैठक घ्यावी. या बैठकीत सर्वांनी मिळून एक उमेदवार ठरवावा. आपल्यासाठी ही चांगली संधी आलेली आहे. ओढाताणीच्या नादात ही संधी घालू नका, असे आवाहन देखील त्यांनी केले.

# कणकवली शहरात पटवर्धन चौकात बेकरीसह दुकानांना आगीचा फटका, लाखोंचे नुकसान

प्रतिनिधी
■ कणकवली

कणकवली शहरातील पटवर्धन चौक येथील असलेल्या आर.बी. बेकरीला आज शुक्रवार दि. १ नोव्हेंबर रोजी भल्या पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास लागलेल्या आगीत आर. बी. बेकरी जळून पूर्णतः बेचिराख झाली आहे. त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या बेकरी लगत बाजूला असलेल्या राजू गवाणकर यांचे कार्यालय व बर्डे मेडीकल व अन्य दुकानांना देखील आगीचा फटका बसला आहे. नगरपंचायतच्या अग्निशामक बंबाद्वारे आगीवर नियंत्रण आणण्यात आले.

या घटनेची माहिती मिळताच



नागरिकांनी धाव घेतली. आगीचा भडका उडाला, त्यामुळे आगीत चौकातील इतर दुकानाना फटका बसला आहे. कणकवली नगरपंचायतचा बंब आल्यानंतर आग आटोक्यात येत नव्हती. त्यानंतर कुडाळ एमआयडीसी व मालवण नगरपंचायतचा बंब बोलावण्यात आला. त्यानंतर आग काही प्रमाणात आटोक्यात आली. आज लक्ष्मीपूजन दिवाळीच्या काळात झालेल्या या दुर्घटनेमुळे काही दुकानचालकांना फटका बसला आहे.

## अहिल्यानगर अंगणवाडी सेविका हत्या प्रकरण

# हत्येला विरोध करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना पोलिसांनी बजावली कारवाईची नोटीस

प्रतिनिधी
■ पुणे

अहिल्यानगर जिल्ह्यात अत्याचाराला विरोध करणाऱ्या अंगणवाडी सेविकेचा खून करण्यात आला. अंगणवाडी सेविकेच्या खून प्रकरणी आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच अंगणवाडी शिक्षिका, मदतनीसांना सुरक्षेची भाऊबीज ओवाळणी द्यावी, अशी मागणी अंगणवाडी कर्मचारी सभेने केली. त्यासाठी येत्या सोमवारी (४ नोव्हेंबर) जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात येणार होते. मात्र, बंडगार्डन पोलिसांनी महिला अत्याचाराच्या गंभीर प्रश्नाची गंभीर दखल घेण्याऐवजी कायदा आणि सुव्यवस्थेची सबब सांगून निवेदन देणाऱ्या अंगणवाडी सेविकांना पोलिसांनी कारवाईची नोटीस बजावली आहे.

अंगणवाडी शिक्षिका, मदतनीस विविध शासकीय योजनांमध्ये सहाय करतात. देशाच्या विकासासाठी त्या काम करतात. यापूर्वी अंगणवाडी सेविकांना अत्याचाराच्या घटनांना सामोरे जावे लागले होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील एका गावातील अंगणवाडी सेविकेवर आरोपी सुभाष बडे याने २४ ऑक्टोबर रोजी अत्याचाराचा प्रयत्न केला होता. अत्याचाराला विरोध करणाऱ्या अंगणवाडी सेविकेचे भिंतीवर डोके आपटून बडे याने खून केला होता. आरोपीने पुरावा नष्ट करण्यासाठी सेविकेचा मृतदेह नदीपात्रात फेकून दिला. अशा घटना रोखण्यासाठी अंगणवाडी सेविकांना सुरक्षेची भाऊबीज ओवाळणी देण्यात यावी, असे निवेदन अंगणवाडी कर्मचारी सभेकडून येत्या सोमवारी (४ नोव्हेंबर) जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांना देण्यात येणार होते. अंगणवाडी कर्मचारी सभेकडून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या घटनेचा निषेध करण्यात येणार होता.

याबाबतची माहिती देण्यासाठी अंगणवाडी कर्मचारी सभेच्या पदाधिकारी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गेल्या. तेव्हा अशा प्रकारचे आंदोलन करता येणार नाही. आंदोलन केल्यास कारवाई करण्यात येईल, अशी नोटीस बंडगार्डन पोलिसांनी पदाधिकारी शैलजा चौधरी, वैशाली गायकवाड, मनीषा गाडे, अनिता आवळे यांना दिली. अंगणवाडी सेविकांना सुरक्षेची ओवाळणी देण्याऐवजी कारवाईची नोटीस बजाविणे योग्य नाही, असे अंगणवाडी कर्मचारी सभेचे अध्यक्ष नितीन पवार यांनी सांगितले.

# 3 आणि 4 नोव्हेंबरला बेस्ट आगार बंदचा इशारा दिल्यामुळे 'बेस्ट अलर्ट'

प्रतिनिधी
■ मुंबई

सुरक्षा व दक्षता विभाग तसेच वाहतूक विभागांच्या वरिष्ठ अधिकार्‍यांकडून व्हॉटस्‌ॲप या प्रसार माध्यमांद्वारे दिवाळी बोनस, कोव्हिड भत्ता, अग्रीमेंट आणि विलनीकरण या मागण्यांसाठी वरळी, कुलाबा किंवा इतर आगारांमध्ये ०३.११.२०२४ व दि.०४.११.२०२४ रोजी आगार बंदचा इशारा असा संदेश प्रसारित होत असल्याने बेस्ट प्रशासन अलर्ट झाली असून या दोन दिवसाच्या रजा मंजूर होणार नसल्याचे परिपत्रक काढले आहे.

बेस्ट उपक्रमातर्फे संपूर्ण बृहन्मुंबई आणि विस्तारित उपनगरातील जनतेला 'अव्याहतपणे परिवहन सेवा' व मुंबई शहर परिसरात 'अविरतपणे विद्युत पुरवठा' या दोन सेवा पुरविल्या जातात. या दोन्ही सेवा महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०२३ अन्वये 'अत्यावश्यक' या सदरात मोडतात. यास्तव सर्व शाखा/विभाग प्रमुख यांना असे सूचित करण्यात येते की, शाखा/विभाग प्रमुख यांनी सेवकवर्गाच्या ०१.११.२०२४ पूर्वी व त्यास लागून घेतलेल्या रजेशिवाय अन्य कोणत्याही प्रकारच्या रजा मंजूर करु नये. हे रुग्णता रजेच्या सत्यता पडताळणी किंवा सदर रुग्णता रजेच्या कारणांशी शाखा/विभाग प्रमुख समाधानी असल्यास लागू पडत नाही. तसेच असेही सूचित करण्यात आले की, सदर दिवशी साप्ताहिक सुट्टीमध्ये बदल किंवा कामाच्या वेळेतील बदल अश्या प्रकारच्या कर्मचारी वर्गाने केलेली विनंती सत्यता पडताळणीशिवाय विचारात घेऊ नये. असेही पत्रकार म्हटले आहे.

## दिवाळी सुट्टीत पर्यटकांच्या स्वागतासाठी महाबळेश्वर सज्ज

प्रतिनिधी
■ सातारा

दिवाळीसाठी महाबळेश्वर, पाचगणीसह साताऱ्यातील, कास आणि वासोटा आदी गिरीस्थळे पर्यटनासाठी सज्ज झाली आहेत. पावसाचे सावट दिवाळी हंगामावर असले तरी वातावरण एकदम आल्हाददायक आहे. हॉटेल व्यावसायिक, वेण्णा लेकवरील घोडेसवारी करणारे छोटेमोठे व्यावसायिक उत्साहात आहेत. दाट धुके, बोचरी थंडी आणि निसर्गाचे विलोभनीय रूप पर्यटकांना साद घालत आहे. दिवाळीनिमित्त विविध ठिकाणी रोषणाई करण्यात आली आहे. पाचगणी, तापोळा, प्रतापगड, ऑर्थररसीट पॉईंट, केटस पॉईंट या ठिकाणी पर्यटकांची मोठ्य़ा प्रमाणात गर्दीची अपेक्षा आहे. पर्यटकांना सर्व सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी पालिका व पोलीस प्रशासन सज्ज आहे. नेहमीप्रमाणे होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी पोलिसांची स्वतंत्र वाहतूक शाखा प्रयत्न करीत आहे.

# महिलांचा अपमान करणाऱ्या विधानाबाबत तत्काळ कारवाई करावी

## डॉ. नीलम गोऱ्हे यांची मागणी

प्रतिनिधी
■ पुणे

शिवसेनेच्या मुंबादेवी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार शायना एनसी यांच्याबाबत बोलताना दक्षिण मुंबईचे खासदार अरविंद सावंत यांनी 'इंपोर्टेड माल चालणार नाही' असे विधान केलेले आहे. अरविंद सावंत हे महाराष्ट्रातील महिलांना मूर्ख समजत आहेत. त्यांनी स्त्रियांबाबत अपमानास्पद शब्द बोलले आहेत. स्त्रियांबाबत अपमानास्पद शब्द खपवून घेणार नाही असे सांगून सावंत यांच्या विधानाचा तीव्र शब्दात निषेध नोंदवून त्यांच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे तात्काळ लेखी तक्रार दाखल करणार असल्याचे शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

मुंबादेवी विधानसभा मतदारसंघातील महाविकास



**निवडणूक आयोगाकडे खा. सावंत यांच्या विरोधात केली लेखी तक्रार**

आघाडीचे उमेदवार अमीन पटेल यांचा प्रचार करत असताना अरविंद सावंत यांनी शिवसेनेच्या मुंबादेवी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार शायना एनसी यांच्यावर अपमानास्पद शब्द उच्चारत टीका केली होती. त्याबाबत शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.



# बारामतीत दोन्ही पवारांचा होणार स्वतंत्र 'दिवाळी पाडवा'

प्रतिनिधी
■ बारामती

देशभरात अनेक मान्यवर कुटुंबीय आपापल्या परीनं दिवाळी पाडवा साजरा करतात. मात्र, बारामतीतील गोविंद बाग येथे संपूर्ण पवार कुटुंबीयांकडून साजरा केला जाणारा दिवाळी पाडवा सण अनेक अर्थानं वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण असतो.

विदेशात वास्तव्यास असतात. त्यामुळं सर्वांची एकत्रित भेट व्हावी यासाठी, मागील अनेक वर्षांपासून पवार कुटुंबीय दरवर्षी दिवाळी पाडव्यानिमित्त एकत्रित येतात. एकत्रित येऊन दिवाळीचा सण मोठ्या आनंद उत्साहात साजरा करतात. मात्र, यंदाच्या दिवाळी पाडव्याला अजित पवार हे उपस्थित राहणार की नाही? यासंदर्भात चर्चांना उधाण आलं होतं. पण आता या चर्चांना पूर्णविराम मिळालाय. शरद पवारांचा पाडवा गोविंदबागेत तर अजित पवारांचा पाडवा काटेवाडीत साजरा होणार आहे. त्यामुळं राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आल्याचं बघायला मिळतंय.

दिवाळी पाडव्यानिमित्त दरवर्षी पवार कुटुंबीय नागरिकांसह कार्यकर्त्यांना भेटत असतात. तसंच शरद पवार यांच्यासह पवार कुटुंबीयांना भेटण्यासाठी आणि दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी सामाजिक, राजकीय, कलाक्रीडा, आदी विविध क्षेत्रातील दिग्गजांसह अनेक जण गोविंद बागेत दाखल होत असतात. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर यंदाचं चित्र बदललंय. पक्ष आणि कुटुंबात फूट पडल्यानंतर आता पवारांच्या दिवाळी पाडव्यामध्येही फूट पडली आहे. अजित पवार यांनी एक्सवर पोस्ट करत यंदाचा पाडवा काटेवाडीत साजरा होणार असल्याची माहिती दिली आहे. "बारामतीकरांनो, सालाबादाप्रमाणे यंदाचा हा दिवाळी सण एकत्र येऊन आपण सगळे साजरा करूया. दीपावली पाडवानिमित्त काटेवाडी येथील माझ्या निवासस्थानी मी तुमचं स्वागतो करतो. चला, बंधुभाव जपूया", असं म्हणत अजित पवारांनी बारामतीकरांना दिवाळी पाडव्याला येण्याचं आवाहन केलं आहे.

विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्याविरोधात राष्ट्रवादीचे (शरदचंद्र पवार) नेते तथा त्यांचे पुतणे युगेंद्र पवार निवडणुकीत उतरले आहेत. त्यामुळं बारामतीत पवार विरुद्ध पवार असा सामना पाहायला मिळतोय. निवडणुकीच्या प्रचारात अजित पवार यांनी शरद पवार यांच्यामुळं कुटुंबात फूट पडल्याचं वक्तव्य केलं होतं. त्यावर शरद पवार यांनी अजित पवारांची नक्कल करत जोरदार प्रत्युत्तर दिलं होतं. दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून बारामतीमध्ये शरद पवार हे दिवाळी पाडव्यानिमित्त गोविंद बागेतील त्यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांना भेटतात. दरवर्षी या दिवाळी पाडव्याच्या कार्यक्रमात गर्दी वाढताना दिसते. परंतु, यंदा दोन ठिकाणी पाडवा असल्यानं बारामतीकर कुठं जाणार? याकडं सर्वांचंच लक्ष लागलंय.

# मुलीच्या प्रचारासाठी एकनाथ खडसे मैदानात, व्यक्त केला विजयाचा विश्वास

## 'महाविकास'चे सरकार येणार असल्याचा दावा'

प्रतिनिधी
■ जळगाव

मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हे आता निवडणूक प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. या मतदारसंघात आपली मुलगी रोहिणी खडसे यांचा प्रचंड मतांनी विजय होईल, असा विश्वास खडसे यांनी व्यक्त केला. तसेच राज्यांमध्ये महाविकास आघाडीचे सरकार येईल, असा दावा देखील त्यांनी केला आहे.

वास्तविक मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघ एकनाथ खडसे यांचा बालेकिल्ला मानला जात होता. त्यावेळी एकनाथ खडसे हे भारतीय जनता पक्षामध्ये होते. त्यामुळे या मतदारसंघावर सलग विजयी होण्याचा विक्रम



खडसे यांच्या नावावर आहे. मात्र 2019 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत याच मतदारसंघात रोहिणी खडसे यांचा पराभव झाला होता. यावेळी देखील रोहिणी खडसे यांना चंद्रकांत पाटील यांचे आव्हान असणार आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाचा या निवडणुकीतील पहिला उमेदवार म्हणून चंद्रकांत पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. त्यामुळे या मतदारसंघाकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

राज्यामध्ये महागाई आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यातील जनता त्रस्त आहेत. राज्यातील जनता ही महाविकास आघाडीच्या बाजूने कौल देणार असल्याचा दावा देखील खडसे यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीत देखील महाविकास आघाडीचे फटाके फुटतील, असा दावा देखील खडसे यांनी केला आहे. रोहिणी खडसे यांचा ज्या कारणांमुळे गेल्या निवडणुकीत पराभव झाला होता, ती कारणे आम्ही शोधली आहेत. त्यामुळे यावेळी त्यांचा विजय नक्की असल्याचे खडसे यांनी म्हटले आहे.

७ वृत्तमानस
मुंबई-क्रीडा
मुंबई, शनिवार, ०२ नोव्हेंबर २०२४

## ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील टीम इंडियाचा इंट्रा स्क्वाड सामना रद्द

**नवी दिल्ली :** भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध मायदेशात कसोटी मालिका संपल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या मोठ्या दौऱ्यासाठी रवाना होईल. ही मालिका २२ नोव्हेंबरपासून पर्थच्या मैदानावर खेळवली जाणार आहे. यादरम्यान भारतीय संघाने एक सामना रद्द केल्याची माहिती समोर आली आहे.ऑस्ट्रेलियाला पोहोचल्यानंतर, भारतीय संघाला पर्थमधील WACA मैदानावर १५ ते १७ नोव्हेंबर दरम्यान इंट्रा स्क्वॉड सामना खेळायचा होता, ज्यामध्ये त्यांचा सामना ऋतुराज गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाला पोहोचलेल्या भारत अ संघाशी होणार होता. मात्र, आता यात बदल करण्यात आला असून इंट्रा स्क्वॉड मॅच रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याऐवजी टीम इंडिया पहिल्या कसोटी सामन्याच्या तयारीवर लक्ष केंद्रित करेल.



## महाराष्ट्राचे कुमार व मुली खो-खो संघ जाहीर

### अलीगड, उत्तरप्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेणार

प्रतिनिधी
■ धाराशिव

अलीगड, उत्तरप्रदेश येथे २५ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या ४३व्या कुमार व मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे कुमार व मुली संघ महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांनी जाहीर केले.

धाराशिव येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेतून हे संघ प्रशांत कदम (सातारा), गोविंद शर्मा (छत्रपती संभाजीनगर), संदीप चव्हाण (पुणे) व भावना पडवेकर (ठाणे) या निवड समिती सदस्यांनी निवडले. या संघात धाराशिवबरोबरच सांगली, सोलापूर, ठाणे, पुणे, अहिल्यानगर, सातारा, नाशिक, मुंबई उपनगर,रत्नागिरी, जालना या जिल्ह्यातील खेळाडूंचा समावेश आहे. या संघाचे स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर १७ नोव्हेंबरपासून ओम साईश्वर मंडळ, मुंबई येथे होणार आहे.

**महाराष्ट्राचे संघ असे**

**कुमार गट :** वळवी सोत्या, वळवी विलास, वळवी भरत, जाधव राज, वसावे जितेंद्र (धाराशिव), बनसोडे प्रज्वल, दळवी प्रेम, देवकाते पार्थ (सांगली), बनसोडे कृष्णा, चव्हाण शुभम ( सोलापूर), गौतम आशिष (ठाणे), गुंडगळ चेतन, माशिरे भावेश (पुणे), वाल्हेकर अनय (अहिल्यानगर), जगताप प्रतिक (सातारा), प्रशिक्षक : युवराज जाधव (सांगली),

**मुली गट :** शिंदे अश्विनी, भोसले तन्वी, धोत्रे सुहानी, काळे प्रणाली (धाराशिव), चाफे सानिका, बिराजदार प्रतीक्षा, तामखडे धनश्री (सांगली), बनसोडे प्राजक्ता, लामकाने स्नेहा (सोलापूर), काटेकर दीक्षा, कंक धनश्री (ठाणे), चौधरी सुषमा (नाशिक), गायकवाड दिव्या (मुं. उपनगर), चव्हाण रिद्धी (रत्नागिरी), शेख जोया (जालना), प्रशिक्षक : श्रीकांत गायकवाड (मुंबई), व्यवस्थापिका सुप्रिया गाढवे (धाराशिव).

## टीम इंडियाचे पुन्हा 'पहिले पाढे पंचावन्न'

### ▶आता एजाझच्या फिरकीपुढे लोटांगण ▶ दिवस अखेर पहिला डावात ४ बाद ८६

प्रतिनिधी
■ मुंबई




मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सुरु झालेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यातही टीम इंडियाच्या स्टार फलंदाजांनी फिरकीपुढे लोटांगण घालण्याची परंपरा पुढे सुरु ठेवली आहे. दुसऱ्या कसोटीत पाहुण्या किवींकडून सपाटून मार खाणारा भारतीय संघ अजूनही पराभवाच्या मानसिकतेतून बाहेर पडलेला दिसत नाहीय.कारण रवींद्र जाडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी न्यूझीलंडचा पहिला डाव २३५ धावांत गुंडाळण्याचा पराक्रम केला. पण पहिल्या दिवस अखेर भारतीय संघाची पहिल्या डावात ४ बाद ८६ अशी पडझड झाल्याने फिरकीवीरांच्या शानदार कामावर पाणी फेरले गेले आहे. टीम इंडिया अद्याप १४९ धावांनी पिछाडीवर आहे. त्यामुळे पाहून न्यूझीलंड संघ पहिल्या दिवशी तरी सरस ठरल्याचे चित्र आहे.

भारताविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावात न्यूझीलंडचा संघ २३५ धावांत आटोपला. शुक्रवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला.पण वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जाडेजाच्या अफलातून फिरकीपुढे पाहुण्यांचा डाव २३४ धावतांचं आटोपला.जाडेजाने ६५ धावांत ५ तर वॉशिंग्टन सुंदरीने ८४ धावांत ४ फलंदाज बाद करीत किवींच्या डावाला सुरुंग लावला. पाहुण्यांचा डाव सावरण्याचे काम करीत विल यंगने १३८ चेंडूंत ७१ तर डेरील मिचेलने १२९ चेंडूंत ८२ धावा केल्या.

फिरकीवीर गोलंदाजांनी मिळवून दिलेली चांगली संधी टीम इंडियाच्या स्टार फलंदाजांनी मात्र हाराकिरी पत्करत वाया घालवली.यशस्वी जैसवाल (३० ) हा त्यातल्या त्यात काहींसा चांगला खेळला.पण कर्णधार रोहित शर्मा (१८ ) ,विराट कोहली ( ४ ,धावचीत ) आणि नाईट वॉचमन म्हणून आलेला मोहम्मद सिराज (० ) हे मात्र सुपरफ्लॉप ठरले. अजूनही यजमान भारत पाहुण्यांपेक्षा १४९ धावांनी पिछाडीवर असल्याने या कसोटीतही यजमान संघाला आवश्यक विजयासाठी जोरदार संघर्ष करावा लागणार हे निश्चित.

### नशिबाने मिळालेली संधी रोहितने गमावली

*संघाच्या डावातील पाचव्या षटकात. रोहित शर्माने पाचव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर चौकार लगावला होता. त्यानंतर या षटकाच्य तिसऱ्या चेंडूवर रोहितने मोठा फटका मारला. आता पुन्हा एकदा रोहितला चौकार मिळणार, असे सर्वांना वाटत होते. पण तिथे न्यूझीलंडचा खेळाडू उभा होता आणि तो आता झेल पकडेल, असे दिसत होते. हा चेंडू न्यूझीलंडच्या खेळाडूच्या हातात विसावलाही, पण त्याच्याकडून एक मोठी चूक घडली. यावेळी झेल पकडत असताना त्याचा तोल गेला आणि त्याच्या हातून चेंडू खाली पडला, त्यामुळे रोहितला यावेळी १५ धावांवर असताना जीवदान मिळाले होते. नशिब यावेळी रोहितबरोबर होते. त्यामुळे रोहितची या डावाच मोठी खेळी होण्याच्या आशा वाढल्या होत्या..रोहित शर्मा सातव्या षटकात मॅट हेन्रीचा सामना करण्यासाठी सज्ज होता. यावेळी रोहित पुन्हा एकदा मोठा फटका मारण्यासाठी सज्ज झाला होता. पण रोहितचे टायमिंग यावेळी चुकले आणि चेंडूने त्याच्या बॅटची कडा घेतली. त्यावेळी मात्र न्यूझीलंडच्या खेळाडूने कोणतीही चूक केली नाही आणि त्यामुळे रोहित शर्माला नशिबाने जे जीवदान मिळाले होते ते वाया गेले. कारण जीवदान मिळाल्यावर रोहित शर्माला फक्त तीनच धावा करता आल्या आणि तो १८ धावांवर बाद झाला. रोहितच्या बाद होण्यामुळे भारतीय संघाला मोठा फटका बसला.*

## दक्षिण आफ्रिकेने वाढवले टीम इंडियाचे टेंन्शन

### बांगलादेश विरुद्ध मालिका जिंकून आफ्रिका डब्ल्यूटीसी गुणतालिकेत चौथ्या क्रमांकावर

प्रतिनिधी
■ मुंबई

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील ३ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर सुरु आहे. या सामन्यापूर्वीच दक्षिण आफ्रिकेने भारतीय संघाचे टेन्शन वाढवले आहे. दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेश या दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेतील दोन्ही सामन्यात दक्षिण आफ्रिकेने विजय मिळवत, मालिका खिशात घातली. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतील स्थिती आणखी मजबूत केली आहे. त्यामुळे टीम इंडियासाठी तिसरा आणि शेवटचा सामना जिंकणे अतिशय महत्वाचे असणार आहे.

बांगलादेशला २-० ने धुळ चारल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ ५४.१७ टक्के सरासरीसह गुणतालिकेत चौथ्या स्थानी पोहोचला आहे. ६२.८२ टक्के सरासरीसह भारतीय संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे.तर ६२.५० टक्के सरासरीसह ऑस्ट्रेलियाचा संघ दुसऱ्या स्थानी आहे. तर फायनलमध्ये जाण्यासाठी प्रबळ दावेदार असलेला श्रीलंकेचा संघ ५५.५६ टक्के सरासरीसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी आहे.

### भारतीय संघासाठी फायनल प्रवेशाची वाट खडतर

*भारतीय संघ गुणतालिकेत सर्वात मजबूत स्थितीत होता. मात्र आता भारतीय संघावर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतून बाहेर पडण्याचं टेन्शन आहे. भारतीय संघ इथून पुढे ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळायची आहे.न्यूझीलंडविरुद्धचा १ आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या पाचही सामन्यांमध्ये भारतीय संघाला विजय मिळवावा लागणार आहे. हे सर्व सामने जिंकले, तर भारतीय संघ सहज फायनलमध्ये प्रवेश करेल. तसं भारताला फायनलमध्ये जाण्यासाठी ६ पैकी ४ सामने जिंकावे लागणार आहेत.*

## जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत ट्रेडिशनल स्पोर्टस अकॅडमीच्या खेळाडूंचे देदीप्यमान यश

■ ठाणे

दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे शालेय जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा २२ ऑक्टोबर २०२४ दरम्यान घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये ट्रेडिशनल स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी विजय प्राप्त केला. जिल्ह्यातील विविध शाळांमधील खेळाडू यात सहभागी झाले होते.

ट्रेडिशनल स्पोर्टस अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन करीत यामध्ये ४ सुवर्णपदक प्राप्त केले. यामध्ये कोमल तळेले (भगवती विद्यालय), समर्थ गांवकर व आयुष चव्हाण (ब्राह्मण इंग्लिश मिडीयम स्कूल), प्रणव बोऱ्हाडे (ज्ञानसाधना कॉलेज) यांचा समावेश होता. तसेच गोजिरी चोरगे,



यश तावडे, कुशल चंदना, भावना बेलोशे (ब्राह्मण इंग्लिश मिडीयम स्कूल ) यांनी रौप्यपदक प्राप्त केले. तर आराध्या काशिद (सेंट जॉन द बाप्टिस्ट हायस्कूल), सान्वी पावसकर व अथर्व तटकरे (ब्राह्मण इंग्लिश मिडीयम स्कूल), श्रेयस सावेनकर (भगवती विद्यालय) यांनी कांस्यपदक प्राप्त केले.

कठीण परिश्रम, खेळाडूंचा सततचा सराव व ट्रेडिशनल स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक केदार जोशी यांचे मोलाचे मार्गदर्शन यातून यशाचे फळ मिळाल्याचे मुख्य प्रशिक्षक सुनिल काशिद यांनी सांगितले. सर्व खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शाळा तसेच ट्रॅडिशनल स्पोर्टस अकॅडमीचे संस्थापक केदार जोशी, मुख्य प्रशिक्षक सुनिल काशिद व सहप्रशिक्षक प्रिन्स व्यास यांना दिले आहे.

## चितगाव कसोटी: द.आफ्रिकेचा एक डाव आणि 273 धावांनी विजय

वृत्तसंस्था
■ चितगाव

बांगलादेश आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेने बांगलादेशचा एक डाव आणि 273 धावांनी पराभव केला. यासह प्रोटीज संघाने मालिका 2-0 ने जिंकली.

गुरुवारी बांगलादेशच्या संघाने 38 धावांवर 4 विकेट्स घेऊन खेळण्यास सुरुवात केली आणि संपूर्ण संघ 159 धावांवर ऑलआऊट



झाला. मोमिनुलने सर्वाधिक 82 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून कागिसो रबाडाने पहिल्या डावात 5 बळी घेतले. डेन पीटरसन आणि केशव महाराज यांनी 2-2 विकेट घेतल्या. सेनुरान मुथुसामी यांनाही यश मिळाले. बांगलादेशला फॉलोऑन स्कोअरही पार करता आला नाही. अशा स्थितीत आफ्रिकेने त्याला पुन्हा फलंदाजीसाठी बोलावले. बांगलादेशचा दुसरा डाव अवघ्या 143 धावांवर आटोपला. दक्षिण आफ्रिकेकडून दुसऱ्या डावात केशव महाराजने 5 बळी घेतले. त्याच्याशिवाय सेनुरान मुथुसामीने 4 बळी घेतले. डॅन पीटरसनलाही यश मिळाले. बांगलादेशकडून दुसऱ्या डावात हसन महमूदने सर्वाधिक नाबाद 38 धावा केल्या.

अशाप्रकारे आफ्रिकेने दुसरी कसोटीही एक डाव आणि 273 धावांनी जिंकली. टोनी डी जॉर्जीला त्याच्या 177 धावांसाठी सामनावीर आणि कागिसो रबाडाला त्याच्या दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये 14 विकेट्ससाठी मालिकेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून गौरवण्यात आले.

## बालवाडी शिक्षक व मदतनीस जाहीर झालेल्या दिवाळी भेटी च्या प्रतीक्षेत

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगर पालिका, खाजगी अनुदानित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आरोग्य सेविका यांच्या सोबतच १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी बालवाडी शिक्षक व मदतनीस यांनाही दिवाळी भेट म्हणून ५००० देण्याचे जाहीर केले होते. पण आता दिवाळी संपायला आली तरी त्यांच्या हातात ही ५००० रुपयांची मिळाली नसल्याचे कामगार नेते रमेश जाधव यांनी सांगितले. बालवाडी शिक्षक व मदतनीस अजूनही या दिवाळी भेटीच्या प्रतीक्षेत असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व पालकमंत्री दीपक केसरकर यांच्या प्रयत्नातून बालवाडी शिक्षक मदतनीस यांना दिवाळी भेट जाहीर केली पण प्रशासनाच्या कारभारामुळे दिवाळी आली तरीही बालवाडी शिक्षक मदतनीस यांना दिवाळी भेट मिळाली नाही. त्यामुळे दिवाळी भेट जाहीर होऊनी प्रशासनाने अद्याप दिवाळी भेट दिली नसल्याची खंत बालवाडी शिक्षक मदतनीस यांच्याकडून व्यक्त केली जात आहे.

कमीत कमी आजच्या दिवशी तरी दिवाळी भेट तातडीने देण्याची व्यवस्था व्हावी जेणे करून शिक्षक मदतनीस यांना भाऊबीजेची खरी भेट मिळेल आणि त्यांची ही दिवाळी आनंदात साजरी होईल. अशी विनंती कामगार नेते मारुती जाधव यांनी आयुक्तांना केली आहे.



***मुंबई:** राजावाडी स्मशानभूमीत व राजावाडी शवविच्छेदन केंद्रातील कर्मचाऱ्यांना दिवाळीकची भेट म्हणून मिठाई वाटप करून शुभेच्छा देतांना घाटकोपर येथील समाजसेवक प्रकाश वाणी, सचिन भांगे,चंद्रकांत हळदणकर, गोपाळ जोशी.*

## मध्य रेल्वेने प्रवाशांना धरले वेठीस; 4 दिवस सुटीचे वेळापत्रक लागू

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेने गुरुवारी दुपारी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय वेळापत्रकामध्ये बदल करत लोकलचे वेळापत्रक रविवारप्रमाणे चालविल्याने प्रवाशांना फटका बसला. यामध्ये काही लोकल उशिराने धावत होत्या, तर काही एसी लोकल रद्द करण्यात आल्या. त्यामुळे नियोजनानुसार कामाला निघालेल्या तसेच खरेदीसाठी निघालेल्या प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला.

ठाणे रेल्वे स्थानकात दुपारी अडीच ते चारदरम्यान एसी लोकल रद्द करण्यात आल्या. मात्र त्याची कोणतीही घोषणा न केल्याने प्रवाशांची तारांबळ उडाली.



तासभर लोकलची वाट पाहून प्लॅटफॉर्म बदलण्यात प्रवाशांची दमछाक झाली. याबाबत प्रवाशांनी उपस्थानक व्यवस्थापकांना विचारले असता वेळापत्रक रविवारप्रमाणे असल्याचे त्यांनी सांगितले.

दिवाळीच्या पहिल्याच दिवशी खोळंबा झाल्याने नाराजी व्यक्त होत आहे. रेल्वेने वेळापत्रक ३१ ऑक्टोबरपासून २ नोव्हेंबरपर्यंत रविवारप्रमाणे चालविण्यात येणार असल्याचे समाजमाध्यमावर दुपारी १:४५ ला जाहीर केले. परंतु, याबाबत रोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नाही. प्रवाशांच्या मते रेल्वेने एक दिवस अगोदर कळविले असते तर प्रवासाचे योग्य नियोजन करता आले असते. सर्व शासकीय कार्यालये आणि बँका सुरू असताना रेल्वेने रविवारच्या वेळापत्रकाचा अवलंब कसा केला, असा प्रश्न विचारला जात आहे.




***मुंबई:** समाजसेवक निलेश मानकर यांनी दरवर्षा प्रमाणे या दिवाळी सणानिमित्त एक पूर्व वृत्तपत्र विक्रेता ह्या भावनेतून माणुसकीच्या बांधिलकितून वरळी लोअर परळ विभागातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्या बंधूंना दिवाळीच्या शुभेच्छा आणि त्यांना छोटीशी भेटवस्तू देवून उत्सव साजरा केला. या प्रसंगी वृत्तपत्र विक्रेता संघाचे विश्वस्त व माझे मित्र जीवन भोसले, रवींद्र देसाई , शंकर रिंगे, बाळा विनरकर आदिसह अन्य विक्रेते उपस्थित होते. यावेळी निलेश मानकर आणि वृतपत्र विक्रेत्यांमध्ये भावनिक संवाद झाला.*

## नोकरदार महिलांसाठी 22 मजली वसतीगृह, आचारसंहितेनंतर म्हाडा प्रशासकीय मान्यता घेणार

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यातून नोकरी-व्यवसायासाठी येणाऱ्या महिलांची मुंबईत निवासाची योग्य सोय व्हावी याकरीता म्हाडाने पुढाकर घेतला असून अशा महिलांसाठी ताडदेवमध्ये एक वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीची कार्यवाही २०२१ पासून सुरू होती, पण आता मात्र रखडलेला हा प्रकल्प मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती आणि पुनर्रचना मंडळाने ८० कोटी रुपये खर्चाच्या २२ मजली वसतिगृहासंबंधीचा प्रस्ताव तयार केला आहे. आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर हा प्रस्ताव राज्य सरकारकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पावठविण्यात येणार आहे. प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवली जाईल.

मुंबईसह राज्यभरात परडणाऱ्या घरांचे प्रकल्प राबवून म्हाडाच्या माध्यमातून लाखो कुटुंबियांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून म्हाडाने विद्यार्थी आणि नोकरदार महिलांकरीता वसतिगृह बांधण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार मुंबई मंडळाकडून काळाचौकी येथील जिजामाता नगरमध्ये विद्यार्थ्यांसाठी २२ मजली, तर दुरूस्ती मंडळाने ताडदेव येथील एम.पी. मिल कम्पाउंड परिसरातील २००० चौरस मीटर जागेवर नोकरदार महिलांसाठी २२ मजली वसतीगृह बांधण्याचा निर्णय घेतला होता. मुंबई मंडळाने यासंबंधीचा प्रस्ताव मान्य करून घेत, निविदा प्रक्रिया अंतिम करून २०२२ मध्ये वसतिगृहाच्या कामाला सुरुवात केली. हे काम सध्या सुरू आहे. मात्र दुसरीकडे दुरुस्ती मंडळाने ताडदेवमधील वसतिगृहाबाबत कोणतीही कार्यवाही केली नव्हती. त्यामुळे ताडदेवमधील वसतिगृह २०२१ पासून रखडलेले आहे. आता मात्र दुरूस्ती मंडळाला जाग आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नोकरदार महिलांसाठीच्या म्हाडाच्या पहिल्या वसतिगृहाचा आराखडा तयार करून अंतिम करण्यात आला आहे. तर वसतिगृहाचा प्रस्तावही तयार झाला आहे. नोकरदार महिलांसाठी ताडदेवमध्ये बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहाचा प्रस्ताव लवकरच प्रशासकीय मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

### ६४५ महिलांची सोय

*एम. पी. मिल कम्पाउंड परिसरातील संक्रमण शिबिराच्या २००० चौरस मीटर जागेवर २२ मजली वसतिगृह बांधण्यात येणार आहे. या इमारतीत २१५ खोल्यांचा समावेश असणार असून यात ६४५ नोकरदार महिलांच्या राहण्याची सोय केली जाणार आहे. या वसतिगृहाच्या बांधकामासाठी ८० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. वसतिगृहात महिलांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. यात पार्लर-सलून, स्वयंपाकघर, एटीएम सेंटर आणि इतर दुकानांचाही समावेश असणार आहे. या सर्व सुविधा इमारतीच्या तळमजल्यावर उपलब्ध करण्यात येणार आहेत.*




***मुंबई:** 'सुगी ग्रुप 'तर्फे आयोजित 'द राहुल देशपांडे कलेक्टीव्ह' या शास्त्रीय संगीत गायक राहुल देशपांडे यांच्या अनोख्या संगीत मैफिलीचे आयोजन बुधवारी ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे येथे आयोजित केले होते.. 'वसंतोत्सव' या प्रतिष्ठीत संगीत महोत्सवाअंतर्गत 'द राहुल देशपांडे कलेक्शन'चे दिवाळी विशेषमधील हे पहिले पुष्प डोंबिवली येथे गुंफण्यात आले. तीन कार्यक्रमांच्या शृंखलेतील दुसरे पुष्प ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे येथे आयोजित केले होते.*

## मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघांसाठी सर्वसाधारण, पोलीस आणि खर्च निवडणूक निरीक्षक नियुक्त

■ मुंबई

मा.भारत निवडणूक आयोगामार्फत मुंबई शहर जिल्ह्यातील दहा मतदारसंघांसाठी सर्वसाधारण, पोलीस आणि खर्च निरीक्षक नियुक्त करण्यात आले असून हे सर्व निवडणूक निरीक्षक जिल्ह्यात दाखल झाले आहेत.

मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघांसाठी पाच सर्वसाधारण, दोन खर्च आणि एक पोलिस निवडणूक निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत.धारावी व सायन कोळीवाडा या मतदार संघासाठी सत्यप्रकाश टी. एल. (भा.प्र.से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ८५९१६९६४०२ आणि ई-मेल आयडी dharavisionkoliwadagenobserver@gmail.com हा आहे. त्यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे. वडाळा व माहिम या मतदार संघासाठी हिमांशू गुप्ता (भा.प्र.से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ८९२८७९३६०१ आणि ई-मेल आयडी wadalamahim genobserver@ gmail.com हा आहे. त्यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे. वरळी व शिवडी या मतदार संघासाठी समीर वर्मा (भा. प्र.से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ८५९१३८१८३२ आणि ई-मेल आयडी worlishivadigenobserver@gmail.com हा आहे. नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे. भायखळा व मलबार हिल या मतदार संघासाठी अंजना एम.(भा.प्र.से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ९१३७३७२५४३ आणि ई-मेल आयडी byculla malabarhill genobserver@ gmail.com हा आहे. त्यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे. मुंबादेवी व कुलाबा या मतदार संघासाठी शिल्पा शिंदे (भा.प्र. से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ९१३७३७८१८३ आणि ई-मेल आयडी mumbadevicolaba genobserver@gmail.com हा आहे. यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ असणार वाजेपर्यंत आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघांसाठी केंद्रीय निवडणूक पोलीस निरीक्षक पोनुगुंतला रामजी (भा.पो.से.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण एलवीन गेस्ट हाऊस, हेन्री रोड, अपोलो बंदर, मुंबई असून संपर्क क्रमांक ८५९१७४३२६८ आणि ई-मेल आयडी observerpolicemumbaicity@gmail. com हा आहे. नागरिकांनी भेटण्याची वेळ दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत असणार आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील धारावी, सायन कोळीवाडा,वडाळा, माहिम, वरळी या पाच विधानसभा मतदारसंघासाठी केंद्रीय खर्च निरीक्षक म्हणून विजय बाबू वसंता (भा.राजस्व सेवा) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ९३२४४००२१६ आणि ई-मेल आयडी exp178to182@gmail.com हा आहे. त्यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे. शिवडी, भायखळा, मलबार हिल, मुंबादेवी, कुलाबा या पाच विधानसभा मतदारसंघासाठी केंद्रीय खर्च निरीक्षक म्हणून अमन प्रित (भा.राजस्व सेवा) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ९३२४४७४०७३ आणि ई-मेल आयडी exp183to187 @gmail.com हा आहे. त्यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे.

## बिश्नोईला मला मारायचं असेल तर त्याने लवकर मारुन टाकावं!

**पाटणा :** बिहारचे अपक्ष खासदार पप्पू यादव सध्या चांगलेच चर्चेत आले आहेत. पप्पू यादव यांना लॉरेन्स बिश्नोई गँगकडून जीवे मारण्याची धमकी येत आहे. मुंबईत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते झिशान सिद्दीकी यांच्यावर गोळीबार झाल्यानंतर पप्पू यादव यांनी लॉरेन्स बिश्नोईला दोन टक्क्याचा किरकोळ गुन्हेगार म्हटलं होतं. त्यांच्या त्या वक्तव्यानंतर त्यांना वेगवेगळ्या फोन नंबरवरुन जीवे मारण्याची धमकी येत आहे. या धमकीवर अखेर पप्पू यादव यांनी मौन सोडलं आहे. "माझं कुणासोबत शत्रूत्व नाही. तसेच मला कुणाची भीती देखील वाटत नाही. लॉरेन्सला मला मारायचं असेल तर त्याने मला मारुन टाकावं. मी तुम्हाला रोखत नाहीय. जे लोक माझ्यावर टीका करत आहेत की, मी घाबरलो आहे. भाई मला लॉरेन्स बिश्नोई गँगच्या माध्यमातून मारुन टाका", असं पप्पू यादव म्हणाले. "माझी इच्छा आहे की, मी लवकर मरावं, जेणेकरुन हिंदुस्तानातून सत्य गायब होऊन जाणार. मी सर्व काही सोडू शकतो. पण घाबरुन आयुष्य जगायची मला सवय नाही. मी आपल्या विचारधारेशी तडजोड करु शकत नाही", असं पप्पू यादव म्हणाले.



# मोदी आमचे चांगले मित्र, हिंदूंचं संरक्षण करु!

## दिवाळीच्या शुभेच्छा देताना डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आश्वासन

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेत मतदानाची तारीख जवळ आलेली असताना आता अमेरिकेत स्थायिक झालेल्या परदेशी नागरिकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. दिवाळीच्या निमित्ताने अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीयांना शुभेच्छा देऊन भारत आणि अमेरिकेतली भागीदारी अधिक मजबूत करण्याचे आश्वासित केले. त्यांनी एक्स पोस्टवरून भारतीयांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.



"हिंदू, ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याकांवरील रानटी हिंसाचाराचा मी तीव्र निषेध करतो. त्यांच्यावर जमावाकडून हल्ले होत आहेत आणि बांगलादेशमध्ये लूट केली जात आहे, यामुळे अराजकता निर्माण झाली आहे. हे माझ्या काळात कधीच घडले नसते. कमला आणि जो यांनी जगभरातील आणि अमेरिकेतील हिंदूंकडे दुर्लक्ष केले आहे. इस्रायल ते युक्रेन आणि आमच्या स्वतःच्या दक्षिण सीमेपर्यंत आपत्ती ठरले आहेत, परंतु आम्ही अमेरिकेला पुन्हा मजबूत बनवू आणि सामर्थ्याने शांतता परत आणू!" असं आश्वासन डोनाल्डट ट्रम्प यांनी भारतीयांना दिलं.

"कट्टरपंथी डाव्यांच्या धर्मविरोधी अजेंड्यापासून आम्ही हिंदू अमेरिकनांचेही संरक्षण करू. आम्ही तुमच्या स्वातंत्र्यासाठी लढू. माझ्या प्रशासनात, आम्ही भारत आणि माझे चांगले मित्र पंतप्रधान मोदी यांच्याशी आमची उत्तम भागीदारी मजबूत करू. कमला हॅरिस तुमचे छोटे व्यवसाय अधिक नियम आणि उच्च करांसह नष्ट करतील. याउलट, मी कर कमी केले, नियमात कपात केली आणि इतिहासातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था तयार केली. आम्ही ते पुन्हा करू, पूर्वीपेक्षा मोठे आणि चांगले करू. आम्ही अमेरिकेला पुन्हा ग्रेट बनवू", असंही ते म्हणाले.


"तसेच सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा. मला आशा आहे की प्रकाशाचा सण वाईटावर चांगल्याचा विजय मिळवून देईल!" अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. ५ नोव्हेंबर रोजी अमेरिकेमध्ये अध्यक्षीय निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. विद्यमान उपाध्यक्ष कमला हॅरीस आणि माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात अत्यंत अटीतटीची लढाई सुरू आहे.

***न्यूयॉर्कमधील शाळांना पहिल्यांदाच दिवाळीची सुट्टी***

*न्यूयॉर्कमधील सार्वजनिक शाळांना इतिहासात पहिल्यांदाच दिवाळीची अधिकृत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. यामुळे 1.1 दशलक्षाहून अधिक विद्यार्थ्यांना दिवाळी सण साजरा करता येणार आहे. गेल्या वर्षी न्यूयॉर्कच्या गव्हर्नर कॅथी हॉचुल यांनी शहरातील सार्वजनिक शाळांना दिवाळीची सुट्टी देण्याचा निर्णय घेतला होता. यानुसार येत्या 1 नोव्हेंबर रोजी न्यूयॉर्क शहरातील शाळा बंद होत्या. महापौर कार्यालयातील आंतरराष्ट्रीय घडामोडींचे उपायुक्त दिलीप चौहान म्हणाले की, न्यूयॉर्क शहरातील शाळांना पहिल्यांदाच दिवाळीची अधिकृत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. हा निर्णय आमच्या शहरातील विविधतेचा आणि आमच्या समुदाय तसेच नेत्यांच्या अथक प्रयत्नांचा परिपाक आहे. दिवाळी सण एकतेचे प्रतीक असल्याचे चौहान यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.*

## अमेरिकेच्या निवडणुकीनंतर इराण इस्रायलवर हल्ला करणार


वृत्तसंस्था
तेहरान



पश्चिम आशियामध्ये प्रचंड तणावाची स्थिती असताना ही परिस्थिती आणखी गंभीर होण्याचे संकेत मिळत आहेत. इराणच्या तीन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने न्यू यॉर्क टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांनी इस्रायलवर हल्ला करण्यासाठी सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. इस्रायलनं इराणवर केलेल्या हल्ल्यात झालेल्या नुकसानाची माहिती खामेनी यांनी गेल्या आठवड्यात देण्यात आली होती. ऑक्टोबर १ रोजी इराणनं इस्रायलवर डागलेल्या क्षेपणास्त्राला प्रत्युत्तर देताना इस्रायलनं इराणच्या लष्करी ठाण्यांना अचूक लक्ष्य केले होते. जर याकडे दुर्लक्ष केलं तर इस्रायलविरोधात पराभव मान्य केल्यासारखे होईल असे खामेनी म्हणाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या आठवड्यातील या हल्ल्या-प्रतिहल्ल्यानंतर अमेरिकेसह अन्य देशांनी इस्रायल व इराण या दोन्ही देशांना आता पुन्हा हल्ले करू नका अशी विनंती केली होती. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन यांनी, आत्तापर्यंत दोन्ही देशांनी एकमेकांवर केलेले हल्ले शेवटचे ठरावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

## दिवाळीला पत्नी आली नाही म्हणून पतीची चिमुकल्यांसह आत्महत्या

वृत्तसंस्था
बुलंद



बुलंदशहर जिल्ह्यातील अनुपशहर कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीतील नागला तेली गावात एका कॅब चालकाने आपल्या मुलांसह आत्महत्या केली. पत्नीने घरी येण्यास नकार दिल्याने कॅब चालकाने विष प्राशन केले. पुनीत असे मृत कॅब चालकाचे नाव असून तो बुलंदशहर पोलीस ठाण्याच्या कोतवाली देहाट भागातील जटपुरा गावचा रहिवासी आहे. पुनीतने आपल्या दोन मुलांसह कारमध्ये बसून विष प्राशन केले होते, त्यामुळे पुनीत आणि त्याच्या मोठ्या मुलाचा मृत्यू झाला, तर दीड वर्षाच्या मुलाची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

आत्महत्या करण्यापूर्वी पुनीतने एक व्हिडिओ बनवला होता. व्हिडिओमध्ये पुनीतने आत्महत्येसाठी पत्नीला जबाबदार धरले आहे. पुनीतने पत्नीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. कॅब ड्रायव्हर पुनीतचा आरोप आहे की, त्याची पत्नी मुलांना सोबत सोडल्यानंतर सहा महिने तिच्या माहेरच्या घरी राहत होती. नुकतेच पुनितने सासरच्या घरी जाऊन पत्नीची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पत्नी राजी झाली नाही. पत्नीच्या रागातून पुनीतने अखेर आपले जीवन संपवण्याचा निर्णय घेतला आणि हे भीषण पाऊल उचलले.

मिळालेल्या माहितीनुसार, दिवाळीच्या एक दिवस आधी पुनीत पत्नीला घेण्यासाठी टॅक्सी घेऊन सासरच्या घरी गेला होता, मात्र पत्नीने घरी परतण्यास नकार दिला. या त्रासाला कंटाळून पुनीतने दोन निष्पाप मुलांसह कारमध्ये बसून विष प्राशन केले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला. तसेच, लवकरच या प्रकरणाचा छडा लावण्याचा दावा पोलीस करत आहेत. आत्महत्या करण्यापूर्वी पुनीतने व्हिडीओ बनवून पत्नीवर अनेक गंभीर आरोप केले होते.








बंदी असतानाही दिल्लीकरांनी फटाके फोडले

## दिवाळीच्या रात्री दिल्लीचा AQI 400 पार

**10 सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये यूपीतील 9 शहरे**



वृत्तसंस्था
नवी दिल्ली

राजधानी दिल्लीची हवा पुन्हा एकदा विषारी झाली आहे. रात्री उशिरा AQI 400 पार. 1 नोव्हेंबर रोजी सकाळी 6 वाजता दिल्ली AQI 391 नोंदवण्यात आला. जर आपण देशातील 10 सर्वाधिक प्रदूषित शहरांबद्दल बोललो तर त्यापैकी 9 उत्तर प्रदेशातील आहेत. संभल, यूपी येथे सर्वाधिक AQI 388 नोंदवला गेला. दिवाळीच्या दिवशी (31 ऑक्टोबर) संध्याकाळी 5 वाजता दिल्लीतील रिअल टाइम एअर क्वालिटी इंडेक्स (AQI) 186 नोंदवला गेला. म्हणजेच, 10-12 तासांत हवा सामान्य ते अत्यंत वाईट श्रेणीत गेली.

दिल्लीत बंदी असतानाही फटाके फोडले दिल्ली प्रदूषण नियंत्रण समितीने (DPCC) 1 जानेवारी 2025 पर्यंत फटाक्यांवर बंदी घातली होती. फटाके बनवणे, साठवणे, विक्री करणे आणि वापरणे यावर बंदी आहे. त्यांच्या ऑनलाइन वितरणावरही बंदी घालण्यात आली होती, तरीही फटाक्यांची आतषबाजी झाली.

14 ऑक्टोबर रोजी दिल्लीत ग्रेप-1 लागू करण्यात आला दिल्लीच्या एअर क्वालिटी इंडेक्सने 200 ओलांडल्यानंतर 14 ऑक्टोबर रोजी दिल्ली एनसीआरमध्ये ग्रेप-1 लागू करण्यात आला. याअंतर्गत हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये कोळसा आणि सरपण वापरण्यावर बंदी घालण्यात आली आहे. कमिशन ऑफ एअर क्वालिटी मॅनेजमेंटने एजन्सींना जुन्या पेट्रोल आणि डिझेल वाहनांच्या (BS-III पेट्रोल आणि BS-IV डिझेल) ऑपरेशनवर कठोरपणे निरीक्षण करण्याचे आदेश दिले आहेत.

रस्ते बांधणी, नूतनीकरण प्रकल्प आणि देखभाल कार्यांमध्ये धुरविरोधी गन, पाणी शिंपडणे आणि धूळ नाशक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यास आयोगाने एजन्सींना सांगितले आहे.

पंजाबमध्ये फक्त ग्रीन फटाके फोडण्यास परवानगी पंजाब सरकारने सुमारे 15 दिवसांपूर्वी सांगितले होते की दिवाळी, गुरुपर्व, ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या उत्सवांमध्ये फक्त ग्रीन फटाके फोडण्याची परवानगी दिली जाईल. हिरवे फटाके असे आहेत ज्यात बेरियम मीठ किंवा अँटीमोनी, लिथियम, पारा, आर्सेनिक, शिसे किंवा स्ट्रॉन्टियम क्रोमेटची संयुगे नसतात.

AQI म्हणजे काय आणि त्याची उच्च पातळी धोकादायक का आहे? AQI हा एक प्रकारचा थर्मामीटर आहे. हे तापमानाऐवजी प्रदूषण मोजण्याचे काम करते. या स्केलद्वारे, हवेत CO (कार्बन डायऑक्साइड), ओझोन, NO2 (नायट्रोजन डायऑक्साइड), PM 2.5 (पार्टिक्युलेट मॅटर) आणि PM 10 प्रदूषकांचे प्रमाण तपासले जाते आणि शून्य ते 500 पर्यंत रीडिंगमध्ये दाखवले जाते.







